# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.०३/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१५) इतिवृत्त**

मंगळवार, दिनांक ०३ नोव्हेंबर २००९ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ४.१५ वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०३. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०४. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०५. श्री. सुरे सिताराम इसराम
०६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०७. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०८. श्रीमती मेहरून्नीसा खान हमीद खान
०९. श्री. कैसरखान बद्रोद्यीन खान
१०. श्री. जावेद हसन खान
११. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
१२. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१३. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१४. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : विधानसभा निवडणुकीत औरंगाबाद शहराचे पुर्व, पश्चिम आणि मध्य मतदारसंघाचे नवनियुक्त आमदार पश्चिमचे मा.श्री.संजय शिरसाट, गेल्या 20 वर्षापासून महानगरपालिकेशी संबधीत असलेले तसेच महानगरपालिकेमधे विविध पदे भुषविलेले मध्यचे आमदार मा.श्री.प्रदिप जैस्वाल, पुर्वचे आमदार मा.श्री.राजेंद्र दर्डा यांनी हॅट्रीक साधलेली आहे. या तिनही माननीय आमदारांचे सभागृहाचे वतीने अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात यावा. तसेच शहराचा विकास करतांना शासनाकडुन जास्तीत जास्त फंड आणावा त्यानुषंगाने अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : महानगरपालिकेच्या संबधीत शहराचे आमदार आहेत त्या सर्वांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.सिताराम सुरे : जो ठराव मांडलेला आहे त्यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : औरंगाबाद शहरातुन तीन आमदार निवडुन आलेले आहे. पुर्व मतदारसंघाचे आमदार मा.श्री.राजेंद्रजी दर्डा यांनी हॅट्रीक साधलेली आहे. मध्य मतदारसंघाचे आमदार मा.श्री.प्रदिप जैस्वाल आणि पश्चिम मतदारसंघाचे आमदार मा.श्री.संजय शिरसाट निवडुन आलेले आहेत. सभागृहाने केलेल्या प्रस्तावानुसार अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात येतो अभिनंदनाच्या प्रती शासनाकडेही पाठविण्यात याव्यात.

श्री.सतिष कटकटे : गारखेडा, विजय नगर येथील जे अतिक्रमण पाडण्यात आले ती जमीन महानगरपालिकेची आहे काय खुलासा करण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : मा.आयुक्त आणि प्रशासकीय अधिकारी यांचे अतिक्रमण मोहिम राबविल्याबाबत अभिनंदन करण्यात येते. महानगरपालिकेच्या जमीनी ताब्यात घेण्याची जी मोहिम चालू आहे त्याबाबतीत सभागृहाने प्रशासनाचे अभिनंदन करायला पाहिजे.

श्री.सतिष कटकटे : प्रशासनाने विजय नगर येथील नागरीकांना बेकायदेशीर बांधकाम करण्याबाबत नोटीस दिली आहे. तेथील नागरीक गुंठेवारीची भरणा केलेली आहे, टॅक्स लावण्यात आलेला आहे पाईपलाईन नळांची सुविधा देण्यात आलेली आहे. जमीन महानगरपालिकेची आहे काय खुलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी : सदरील जागा दिनांक 03.02.1990 रोजी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली आहे आणि महानगरपालिकेच्या मालकीची जागा आहे.

श्री.सतिष कटकटे :सदरील बाबीचा उल्लेख नोटीसमधे का करण्यात आलेला नाही. बेकायदेशीर बांधकाम शहरात अनेक ठिकाणी चालू आहे ते का तोडण्यात आले नाही.

श्रीमती मेहरून्निसा खान : अमरप्रीतचे बांधकाम का नाही तोडण्यात आले.

श्री.सतिष कटकटे : पी आर कार्डवर महानगरपालिकेचे नाव लावण्यात आलेले आहे काय?

प्रशासकीय अधिकारी :महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले आहे. पी आर कार्डची कार्यवाही चालू आहे.

श्री.प्रशांत देसरडा :ओपन स्पेस वरील अतिक्रमण पाडण्याचे काम प्रशासनाकडुन चालू आहे त्यामुळे मा.आयुक्त,उपआयुक्त,प्रशासकीय अधिकारी आणि पोलिस प्रशासनाचे अभिनंदन करायला पाहिजे परंतु स.सदस्यांनी जो प्रश्न मांडला आहे त्यात सन 1990 रोजी ओपन स्पेस हस्तांतरीत झाली आहे. ले आउटच्या व्यतिरीक्त जी जमीन आहे त्या व्यक्तिने सदरील नागरीकांची फसवणुक करून प्लॉट विक्री केलेली आहे. प्रशासनाने जी नोटीस दिली की, विना परवानगी बांधकाम करीत आहे परंतु प्रशासनाने दोन्ही मुद्दे नोटिसमधे दिले गेले पाहिजे होते परंतु त्यातुनही काही निष्पन्न होणार नाही त्यामुळे नगरपालिकेपासून ते महानगरपालिकेपर्यंतच्या ज्या प्रॉपर्टी महानगरपालिकेने घेतली त्याची यादी देण्यात यावी म्हणजे इतर व्यक्ति त्याचा गैरफायदा घेणार नाही. लिहुन देणारा श्री.निरंतर आणि बॉन्ड पेपर घेणारा यो.ग. निरंतर याच कारणामुळे तिन अधिकाऱ्यांना निलंबीत केले होते. महानगरपालिकेची जमीन विकणारा जो व्यक्ति आहे त्याची सखोल चौकशी व्हावी. ज्यांचे अतिक्रमण पाडले त्यांना विचारणा करण्यात यावी की जमीन कोणी विकली

त्याच्या विरूध्द पोलीस गुन्हा दाखल करण्यात यावा. बॉन्ड पेपर सरकारी नौकराच्या नावाने घेतलेला आहे श्रीमती सुशिला निरंतर यांचा मृत्यु होऊन सहा वर्ष झालेले आहे. विजय नगर येथील घरे पाडण्यात आले तेथील नागरीक हे भाजीपाला विकणारे नागरीक आहे. मनपाने मालकीच्या जागांना कंपाउड वॉल,बोर्ड लावयला पाहिजे. सदरील बॉन्ड पेपरवर नोटरीसुध्दा नाही त्यामुळे संबधीतावर गुन्हे दाखल करण्यात यावेत.

श्री.सतिष कटकटे : ओपन स्पेसच्या बाबतीत महापौर यांच्या दालनात बैठक घेण्यात आली होती. कुशीनारा गृहनिर्माण सोसायटीत मनपाच्या अधिकारी कर्मचारी यांनी घरे बांधलेली आहे त्याबाबतीत प्रशासनाने कुठली कारवाई केली आहे. विजय नगर येथे मनपाच्या नावावर पिआर कार्ड नसतांना घरे पाडण्यात आली एवढी घाई कशासाठी करण्यात आली. त्या जागेवर कंपाउड वॉल,बोर्ड लावयला पाहिजे होता. पिआर कार्डवर आजपर्यंत नाव का नाही लावण्यात आले.

मा.सभापती : कुशीनारा आणि त्रिवेणी नगर येथे प्रशासनाने कोणती कारवाई केली खुलासा करण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : अतिक्रमण किड म्हणून काढले. अभिनंदन. विजय नगर येथे जे घरे पाडण्यात आले तिथे सर्वसामान्य भाजीवाले राहत होते. मनपाने एखादा बोर्ड लावला असता, कुंपण घातले असते तर लोकांनी जागा घेतली नसती. तर त्या नागरीकांची फसवणुक झाली नसती. गरीब लोक फसले.

श्री.सतिष कटकटे : मनपाचे अतिक्रमण पाडणार नाहीत परंतु गरीबांचे अतिक्रमण पाडण्यात येतात.

श्री.भगवान घडमोडे : त्यावेळचे प्रशासनातील प्रशासकीय अधिकारी तसेच इमारत निरीक्षकांवर कडक कारवाई झाली पाहिजे बेकायदेशीर बांधकाम झाले कसे. कुशीनारामधे आपले कर्मचारी आहेत त्यांचे अतिक्रमण पाडले नाहीत परंतु गरीबांचे अतिक्रमण पाडण्यात आले.

श्री.सतिष कटकटे : कुशीनारामधे जमीन ताब्यात का नाही घेण्यात आली. कुशीनारामधे ओपनस्पेस बांधकाम आहे काय? परवानगी दिलेली आहे काय? बोकायदेशीर बांधकाम झालेली आहे काय?

श्री.नारायण कुचे : मनपाच्या ओपन स्पेसवर बांधकाम चालू असतांना प्रशासकीय अधिकारी आणि इमारत निरीक्षक काय करत होते.

श्री.सतिष कटकटे : महानगरपालिकेने जाणुनबुजून गरीबांचे अतिक्रमण पाडण्यात आले.

श्री.भगवान घडमोडे : मनपाच्या अधिकाऱ्यांना बेकायदेशीर बांधकाम करण्यास परवानगी आहे काय?

श्री.सतिष कटकटे : बेकायदेशीर बांधकाम म्हणून नोटीस दिली तर मग पैसे भरून बांधकाम कायदेशीर करून घ्यायला पाहिजे.

मा.सभापती : कुशीनारा आणि त्रिवेणी नगर येथे प्रशासनाने कोणती कारवाई केली खुलासा करण्यात यावा.

सहायक आयुक्त-1 : कुशीनारा मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेमधे श्री.उत्तम पंडागळे, उत्तम हिवराळे, मधुकर गंगावणे या तीन कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले

होते त्यांचा प्राथमिक चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे आणि प्राथमिक चौकशीमधे ओपन स्पेसमधे कुठलेही बांधकाम झालेले नाही असा अहवाल संबधीत अधिकाऱ्यांनी दिलेला आहे.

मा.सभापती : त्या ठिकाणी 50 हजार स्के.फुट ओपन स्पेसवर बांधकाम केलेले असेल आपणांस निलंबीत करायचे काय? स्थायी समितीची बैठक स्थगीत करून त्या ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करण्याकरीता जावे लागेल. 50 हजार स्के.फुट ओपन स्पेसवर घरे,गोडाउन बांधकाम केलेले आहे.

सहायक आयुक्त-1 : जो अहवाल आलेला आहे त्यावरून खुलासा केलेला आहे. कमिटी नियुक्त केली आहे त्या कमिटीने अहवाल दिलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : आदर्श आचारसंहिता चालू असतांना निलंबीत कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले. तीन लोकांचा खुलासा केलेला आहे तीन लोकांचे अतिक्रमण झालेले नाही असे प्रथमदर्शनी अहवाल आलेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जे बांधकाम झालेले आहे त्यास परवानगी दिलेली आहे काय?

मा.सभापती : बांधकाम बेकायदेशीर आहे.

श्री.प्रशांत देसरडा : स्थायी समितीने कमिटी नेमल्यावर अहवाल स्थायी समितीकडे यायला पाहिजे.

मा.सभापती : आचारसहिता असल्याकारणाने अहवाल आला नाही. मागील बैठकीत ADTP यांनी खुलासा केला आहे की, त्रिवेणी नगर आणि कुशीनारा येथे टि.पी सेक्शनने कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी दिलेली नाही.

श्री.प्रशांत देसरडा : सदरची स्थायी समिती हि पहिली समिती आहे जी प्रशासनाच्या पाठीमागे खंबीरपणे उभी राहिली आहे. परंतु प्रशासनाने चुकीचे काम केले आहे असा माझा आरोप आहे. अहवाल स्थायी समितीत यायला पाहिजे होता. या ठिकाणी गरीबांना वेगळा न्याय व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना वेगळा न्याय. उस्मानपुरा येथे महानगरपालिकेचा ड्रायव्हरने विनापरवानगी दुकाने बांधकाम केलेल्या आहेत. माझा आरोप आहे की, मोठया अधिकाऱ्यांचे घरे त्या ठिकाणी आहेत.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा की, त्रिवेणी आणि कुशीनारा गृहनिर्माण सोसायटीस परवानगी आहे काय?

श्री.सतिष कटकटे : प्रशासनाने घरे तोडण्याची एवढी घाई कशासाठी केली.

श्री.नारायण कुचे : दिनांक 18.08.2009 रोजीच्या बैठकीत आदेश देण्यात आले होते की, दोषी अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशासन त्वरीत निलंबीत करणार आहे. दोषी विरूध्द गुन्हा दाखल करावा म्हणून आदेश देण्यात आले होते.

मा.सभापती : प्रशासनाने गुन्हा दाखल केला नाही उलट निलंबीत कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात आलेले आहे.

उप अभि.(न.र.)श्री.निकम : कुशीनारा गृहनिर्माण संस्थेमधे याप्रकरणी चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

मा.सभापती : मागील बैठकीत प्रशासनाने खुलासा केला की, त्रिवेणी आणि कुशीनारा गृहनिर्माण सोसायटीस बांधकाम परवानगी दिलेली नाही त्यानंतर देण्यात आली असेलतर सांगण्यात यावे.

उप अभि.(न.र.)श्री.निकम : सन 1986ची परवानगीची एक प्रत आहे, छायाप्रत संचिकेमधे आहे.

श्री.सतिष कटकटे : सन 1986 साली किती व्यक्तिंना परवानगी दिलेली आहे. सदरील ठिकाणी एका शिक्षीकेचे बांधकाम चालु आहे ते बांधकाम का नाही तोडण्यात आले. तीन लोकांना निलंबीत कशाच्या आधारे केले.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा केला आहे की, बांधकाम परवानगी दिलेली नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : चौकशी अहवाल आला. पण समोर आलेला नाही. विजयनगर खाजगी असेल तर गुंठेवारीमध्ये करावे. महानगरपालिकेची जागा असेल तर गुंठेवारी कसे. अतिक्रमण काढण्यापुर्वी प्रशासनाने सर्व कागदपत्र,प्लॅन देण्यात यावा. ज्यांनी जागा विकली त्यांच्या विरूध्द गुन्हे नोंदविण्यात यावेत.

श्री.सतिष कटकटे : महानगरपालिकेने मालकी सिध्द करावी.

श्री.नारायण कुचे : कुशीनारा येथील बांधकाम थांबविण्यात यावे आणि तिथे सिल लावण्यात यावे म्हणून आदेश दिले होते त्या आदेशाचे पालन झाले आहे का?

मा.सभापती : अशी कुठली कारवाई करण्यात आलेली आहे काय? प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त(सिडको) : कुशीनारा व त्रिवेणी येथे अद्यापपर्यंत सिलची कारवाई केलेली नाही.

श्री.सतिष कटकटे : पीआरकार्ड तसेच इतर जागेबाबतची माहिती केव्हा बघतली.

उपआयुक्त(सिडको) : प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा केल्याप्रमाणे आपल्याकडे रिलीक्वीशमेंट डीड आहे.

मा.सभापती : कोणत्या वर्षाची आहे.

उपआयुक्त(सिडको) : सन 03.02.1990ला हि 690 स्के.मिटरची जागा रिलीक्वीशमेंट डीड ने दिलेली आहे.

श्री.सतिष कटकटे : पीआर कार्डवर नाव लावण्यात आले आहे का.

उप आयुक्त(सिडको) : सदरील अतिक्रमण हे 30 वर्षापासूनचे आहे अतिक्रमण काढण्यासाठी कुठूनतरी सुरवात करणे गरजेचे होते. ओपन स्पेसवर सध्या लक्ष केंद्रित करत आहे.

मा.सभापती : कुशीनारा आणि त्रिवेणी नगर येथे कारवाई का नाही केली.

श्री.प्रशांत देसरडा : इतिवृत्ताची जेव्हा पहाणी केली तेव्हा प्रत्येक पानावर प्रशासनास करायला सांगीतलेले आहे. प्रत्येक पानावर काहीना काही मागणी तसेच सभापतींनी आदेश दिलेले आहे. कुशीनारा,त्रिवेणी,अमरप्रीत,सनी टॉवर,ड्रेनेजच्या रॉडच्या मशीनचे असेल जाफरगेट येथील रविवारचा बाजार असेल किंवा शिक्षण विभाग अथवा पांढऱ्यां शुभ्र लाईट फिटींग असेल अशे 15 ते 20 आदेश प्रशासनास दिलेले आहे परंतु एकाचाही निपटारा झालेला नाही. प्रशासनाच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे राहिलो आहे परंतु प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. महानगरपालिकेकडे लाईट बिल भरण्यास पैसे नाही माझ्या वार्डातील एका हॉलचे मिटर कट करण्यात आले कारण लाईट बिल भरणा केली नाही. आयडीबीआय बॅकेस मनपाने जागा भाडेतत्वावर दिली की कशी दिली, लाईटबील कोण भरतो. बॅकेने मोठमोठे बोर्ड लावले आहे त्यास परवानगी घेतली आहे काय? औरंगपूरा भाजी मंडई येथे चार मजली इमारत बिओटी तत्वावर बांधण्यासाठी संबधीत कंत्राटदार इमारत बांधण्यास तयार

आहे आज रोजी अलिशान चार मजली इमारत तयार झाली असती परंतु नंतर माहिती प्राप्त झाली की सदरची इमारत महानगरपालिकेच्या नांवावर नाही. भाजीमंडईची दुर्दशा झाली आहे. स्थायी समितीला अधिकार दिलेले आहे परंतु स्थायी समितीने त्याचा वापर केलेला नाही. एकमेव स्थायी समिती आहे की, निलंबीत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मध्यस्ती करत नाही. सक्षम असे आयुक्त महानगरपालिकेस मिळालेले आहे त्याच्यामधे हस्तक्षेप करणार नाही. त्यांना जे योग्य वाटेल त्यांना ते घेतील आणि त्यांना जे योग्य वाटणार नाही त्यांना घेणार नाही. सिडको हडको येथे पाच हजार फिटींग लावण्याचे आदेश दिले आणि लाईटचे मेंन्टन्सचे टेंडर काढले लाईटचे मेंन्टन्स करणारा तोच पांढरे लाईट लावणारा तोच पांढरे लाईट लावले तर त्यास मेंन्टन्सचे पैसे मिळणार नाहीत. म्हणुन तो पांढरे फिटींग लावत नाही. म्हणुन काम केलेले नाही. एखादया नगरसेवकाने काम सांगीतल्यास अधिकारी टोलवाटोलवी करतात त्यामुळे स्थायी समितीचा कायदयाचा आधार घेवुन कडक कारवाई करा. अधिकाऱ्यांचे उघडया विद्युत डीपी कडे लक्ष नाही तर तीस तीस लाखाच्या टेंडरकडे यांचे लक्ष असते.

श्री.भगवान घडमोडे : प्रशासकीय यंत्रणामधे सुधारणा करण्याची गरज आहे. अभिनंदन केले. अंकुशही ठेवणेचे काम आहे. प्रशासनास जे योग्य वाटते ते निर्णय घ्या त्यास आमचा विरोध नाही परंतु प्रशासनावर नियंत्रण असणे गरजेचे आहे. शहरात विस बाय तीस चे प्लॉटिंगचे बांधकाम सर्रास सुरू आहे. भविष्यामधे गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. शहरात छोट छोटया गल्ल्यांमधे अनाधिकृत बांधकाम केलेले आहे त्या ठिकाणी आग लागल्यास अग्निशमनची गाडी त्या ठिकाणी पोहचु शकत नाही. अधिकारी कर्मचाऱ्यांमुळे शहराची परिस्थिती बकाल बनत आहे कुठे रस्ते,खेळाचे मैदान,शाळा यांचे नियोजन नाही. मा.आयुक्तांनी प्रशासनावर अंकुश ठेवावे. ज्या कारवाया झालेल्या नाहीत त्या का नाही झाल्यात याचा लेखाजोखा मा.आयुक्तांनी ठेवावा. बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजेत.

श्री.नारायण कुचे : महानगरपालिकेचा निलंबीत कर्मचारी श्री.भरत जैस्वाल यांनी मुकूंदवाडीच्या रोडवर 20 खोल्यांचे अतिक्रमण केलेले आहे. व बाकीचे 200x300 फुट आहे. वारंवार ओदश देवुन सुध्दा अतिक्रमण पाडण्यात आलेले नाही. प्रशासकीय अधिकारी यांना प्रत्यक्ष अतिक्रमण दाखविण्यात आले.

श्री.रविकांत गवळी : सर्व सदस्यांनी गंभीरपणे विषय मांडलेला आहे. प्रशासनाने यांची गंभीर दखल घेण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी : प्रत्यक्ष अतिक्रमण ठिकाणी जावुन मा.आयुक्तांच्या आदेशानुसार पहाणी केलेली आहे, टाउन प्लॅनिंग येथे संचिका पाठविण्यात आलेली आहे मार्कींगचे कामही सुरू आहेत. जे कागदपत्र दिले आहेत त्या कागदपत्रांची तपासणी करून लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल.

श्री.सतिष कटकटे : विजयनगर येथील अतिक्रमण काढले ते मनपाच्या मालकीचे होते का, पीआर कार्डवर नोंद आहे का?

प्रशासकीय अधिकारी : विजयनगर येथील जागेचा पुर्ण मालकीहक्क महानगरपालिकेचा आहे. पीआर कार्डवर नोंद घेण्याची कारवाई सुरू आहे.

श्री.प्रशांत देसरडा : कुठल्याही लेआउटला परवानगी दिलीतर सिटी डेव्हलपमेंट,बेटरमेंट चार्जेस भरून घेत असतो. संबधीत ले आउटधारक बेटरमेंट चार्जेस भरतो त्यांनी कंम्पलसरी त्यानी त्या रकमेमधे कंपाउड वॉल बांधावी हा निर्णय घेता येईल का? स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांच्या वार्डातुन बेटरमेंट चार्जेस जवळपास पाच कोटी आलेले आहेत. कंपाउड वॉल हा त्या मालकांनीच बांधावे जे पैसे आहेत ते सिटी डेव्हलपमेंट,बेटरमेंट चार्जेस मधून वजा करावेत.

मा.सभापती : अतिक्रमण आणि सर्वे बाबत सविस्तर चर्चा झालेली आहे मा.आयुक्त याबाबतीत खुलासा करतील.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : नगर रचना विभाग, रेखांकन मंजूर करते. पुर्वी मंजूर केलेले रेखांकन एकत्र करून कार्यवाही करीत नाही. तुकडे तुकडे करून मंजुरी देते.

श्री.भगवान घडमोडे : 20 बाय 30 बाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : हर्सुल येथे डिपी रोडला रस्ताच ठेवलेला नाही. त्या बांधकाम परवानगीला स्थगीती देण्यात यावी त्यावर चौकशी समिती नेमण्यात यावी. 20 बाय 30 बाबत प्रशासनाने निवेदन द्यावे की, 20 बाय 30 चे प्लॉट कुणी खरेदी करू नये. महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही. 20 बाय 30 चे प्लॉट घेणारे आणि विकणारे दोघेही गुन्हेगार होतील. दोघांवर कार्यवाही होईल.

मा.सभापती : सर्व्हेनंबर 176/1/2 मधे 50 ते 60 नागरीक भेटून गेले आहे.

श्री.रविकांत गवळी : गेल्या दोन वर्षापासून याच विषयावर चर्चा चालू आहे नऊ इतिवृत्त कायम करण्याकरीता आलेले आहेत त्यास सात दिवसांचा अवधी देण्यात यावा. महानगरपालिकेची परवानगी असलेल्या वसाहतीमधे डिपी रोड ॲप्रोच होण्यासाठी एक बांधकाम रोड डेव्हलपमेंटमधे टाकलेले होते ले आउटमधे नॉट अप्रुव्ह लिहिलेले आहे असे असतांनासुध्दा बांधकाम चालू आहे. ते बांधकाम थांबविण्यात आले तर किमान अडीच ते तीन हजार लोकांना जाण्यायेण्याकरीता रस्ता होईल.

मा.सभापती : मौजे हर्सुल औरंगाबाद येथील सर्व्हे नंबर 176/1/2 मधे जे बांधकाम चालू आहे त्यास तात्काळ स्थगीती देण्यात येते. प्रशासनाने बांधकाम तात्काळ थांबवावे. याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी मुख्य लेखापरिक्षक आणि उपअभियंता श्री.काझी यांची समिती नेमण्यात येते याबाबत सविस्तर चौकशी करून आठ-दहा दिवसात सविस्तर चौकशी करून अहवाल स्थायी समितीकडे सादर करण्यात यावा. बांधकाम काढण्याचे आदेश प्रशासकीय अधिकारी यांना द्यावेत.

मा.आयुक्त : गेल्या दिड तासापासून महानगरपालिकेच्या महत्वाच्या बाबींवर तसेच मागील स्थायी समितीच्या बैठकीमध्ये या बैठकीमधे जे निर्णय घेण्यात आले त्या संदर्भात गंभीर चर्चा स.सदस्यांनी केलेली आहे. त्यांच्या सर्व भावनांशी मी सहमत आहे. कामाची गती जी पाहिजे ती नाही स.सदस्य श्री.प्रशांत देसरडा यांनी सांगीतल्या प्रमाणे सदरच्या इतिवृत्तामधे एकतरी विषय असा दाखवावा जो प्रशासनाने केलेला आहे. हि बाब अतिशय गंभीर बाब आहे

प्रशासनाची निश्चितच ढिलाई पडलेली आहे. मी रूजू झाल्यापासून प्रत्येक सभेचे इतिवृत्त त्याचे गेल्या वर्षभरापासून जे काही मुद्दे उपस्थित झाले त्याच्या अनुषंगाने सतत 15 दिवसांनी दर महिण्याच्या मिटींगमधे आढावा घेतला जावा त्याचा पाठपुरावा घेतला जावा. किती विषयावर कार्यवाही झाली याचा सविस्तर अहवाल सुरू करावा सादर करावा. अशा सुचना दिल्या गेलेल्या आहेत दुर्देवाने बऱ्याचशा बाबी झालेल्या नाहीत हि सत्य बाब आहे. 15 दिवसांच्या मिटींगमधे याचा आढावा सुरू करण्यात येईल ज्या ज्या बाबी तातडीने करणे आवश्यक आहे त्याच्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे काम करण्यात येईल. मा.सभापती यांनी हर्सुल येथील बांधकामाच्या स्थगीतीबाबतचे पत्र दिले आहे. मा.सभापती यांनी सांगीतल्याप्रमाणे चौकशी समिती नेमलेली आहे. या समितीने आठवडयाभरात अहवाल सादर करावा. योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. अतिक्रमण हा विषय महानगरपालिकेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय आहे गेल्या दोन महिण्यांपासून बऱ्याच बैठकांमधून सदरचा विषय गांर्भीयाने चर्चीला गेला होता. अनेक ठिकाणचे स्पॉटस् Idintify केले होते या ठिकाणी असे अतिक्रमण आहेत. कोटयांवधींची मालमत्ता दुसऱ्यांच्या घशात चालली आहे. यापुर्वी मी सांगीतले होते की, महानगरपालिकेची एक इंचभर जागाही जावु देणार नाही. महापालिकेमार्फत होत असलेली कार्यवाही आमच्याकडे असलेली यंत्रणा हे ठरल्यानंतरच कार्यक्रम लावण्यात आला होता. दोन ते तीन अडचणी महानगरपालिकेसमोर होत्या पीआर कार्ड तयार नाहीत जागा महापालिकेच्या आहेत रेकॉर्डला नावे नाहीत ओपनस्पेस आहेत ते Idintify करणे ADTP कडुन त्याची मोजणी करून घेणे मार्कींग करून घेणे आणि मग काढण. हे सर्व करणे आवश्यक आहे. त्यासाठी एक कमिटी नेमण्यात आली उपआयुक्त श्री.जावळीकर त्यांच्या अध्यक्षतेखाली एक गट स्थापन केला. प्रशासकीय अधिकारी, मालमत्ता अधिकारी, ADTP, विधी सल्लागार यांचा समावेश करण्यात आला आहे.गेल्या वर्षी जे अतिक्रमण काढण्यात आले त्यात काही लिगल इश्यु निर्माण झाले होते. रेल्वेस्टेशन येथील एक अतिक्रमण काढण्यात आले होते आणि तो व्यक्ति न्यायालयात गेलेला आहे त्यानी एक कोटीच्या मोबदल्याची मागणी केलेली आहे. चुकून एखादे अतिक्रमण काढण्यात आले त्याचे सर्व्हे,मार्कीग झाले नाही ते अतिक्रमण चुकून काढले जावु शकते आणि ते महानगरपालिकेस अडचणीचे जावु शकते हा पहाण्याचा प्रयत्न केलेला आहे. अतिक्रमणाच्या संदर्भांत जवळपास 25 बैठका घेण्यात आलेल्या आहेत बैठकीत आढावा घेवुन कामाला लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. महानगरपालिकेच्या ज्या स्वतःच्या जागा आहे त्यात पीआर कार्ड बघण्याची आवश्यकता नाही मोकळया जागा आहेत. ले-आउट मधील मोकळया जागेवर लोकांनी अतिक्रमण केलेले आहे ज्या जागा संपादन केल्या पैसे दिलेत परंतु लोकांनी जागा सोडल्या नाहीत या दुसऱ्या टप्प्यामधे घेण्यात याव्यात. वर्गीकरण करून ज्या ज्या ठिकाणी महत्वाचा जागांचे व्हॅल्युएशन मोठया प्रमाणावर आहे. त्या जागा कुणाच्या

घशात जाणार नाहीत म्हणुन प्रयत्न झालेत. याच बरोबर जिथे जिथे असं लक्षात आले की, लोक कोर्टात जावु शकतील स्टे घेवु शकतील एका एका केसमधे पाच पाच ठिकाणी कॅव्हेट दाखल केलेत. बऱ्याच वेळा बऱ्याच ठिकाणी अतिक्रमण पथकावर पथराव करण्याचा प्रयत्न केला अस असतांना पथक आजीबात मागे सरकलेले नाही त्यांना तेवढा मॉरल सपोर्ट दिलेला आहे. मनुष्यबळ कमी होते सुरक्षा यंत्रणा कमी झाली होती. पोलीस पाठबळ कमी झाले होते मध्यंतरीच्या कालावधीमधे हि सर्व यंत्रणा उभी करण्यासाठी वेळ लागला. चाळीस मजुर व चाळीस सुरक्षा रक्षक घेण्यात आलेले आहेत त्यात एक्स सर्व्हिस मॅन 20 ते 25 जणांना घेण्यात आले. आचारसंहितेच्या काळात मोठा पोलिस बंदोबस्त घेवुन अतिक्रमण काढण्याचा संकल्प केला होता परंतु पोलिस प्रशासनाने सांगीतले की, आता विधानसभा निवडणुक चालु आहे त्यामुळे कायदा व सुरक्षतेचा प्रश्न पोलिस प्रशासनावर आहे. मतमोजणी झाल्यानंतर पोलिसांचा आपणास सपोर्ट केला जाईल. अतिक्रमणामुळे शहर बकाल होत चालले आहे रस्ते रूंद केले पाहिजेत अतिक्रमीत झालेल्या जागा रिकाम्या केल्या पाहिजेत. ज्या ज्या जागां खुल्या होत्या, लिगल ओपनीयन मिळाले,टाउन प्लॅनिंगने सांगीतले या जागा क्लिअर आहेत. एक एक जागा Identify करणे मार्कीग करणे आणि पुढे जाणे हा मार्ग घेण्यात आला. सांगण्यास आनंद वाटतो की, शहरातील जवळपास 15 ते 16 अतिक्रमण काढण्यात आलेले आहे. विजयनगर येथील अतिक्रमण बाबत महानगरपालिकेची असलेली 20 हजार स्के.फुटची जागा त्याचे असलेले व्हॅल्युएशन अतिशय महत्वाचे आहे. अशा ज्या अडचणी आल्या आहेत त्यांचे पुर्नवसन करण्यासाठी काही पर्याय शोधता येतो काय? तो पहावा लागेल परंतु जागा खुल्या कराव्या लागेल. ज्या ठिकाणी रोडला ट्रॅफिकला अडचणी आल्या आहेत जिथे महत्वाच्या जागा जात आहे अशा वेळेस कठोर व्हावे लागेल. कुशीनाराचा तपशीलवार अहवाल येणे बाकी आहे कर्मचाऱ्यांना कामावर जरी घेतले असेल तरी चौकशी सुरू आहे. सदरील जागा हया आपल्या आहेत आपल्या कर्मचाऱ्यांच्या जागा आहेत त्या कुठे जात नाही. प्रायरोटी ठेवण्यात आली की, ज्या जागा बाहेर लवकर जावु शकतात कोर्टबाजी होवु शकते अशा जागा पहिले काढल्या पाहिजेत आणि सामान्य जनतेला संदेश पोहचला पाहिजे की, अतिक्रमण करणे बरोबर नाही. 20 बाय 30 बाबत स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे कार्यवाही सुरू झालेली आहे. पेपरला निवेदन देणे की, लोकांनी यात पडु नये देणारा घेणारा बेकायदेशीर ठरेल तसेच ज्या ज्या ठिकाणी बेकायदेशीररित्या जागेचे हस्तांतरण झाले जसे स.सदस्यांनी सांगीतल्या प्रमाणे श्री.निरंतर यांनी परस्पर जागा विकुण टाकली अशा व्यक्तिंवर जे Identify झालेत किंवा होतील त्यांच्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येईल. सभागृहातील सर्व स.सदस्यांना आश्वासित करू इच्छितो की, सदरची मोहित वेगाने चालु ठेवणार आहे. महानगरपालिकेच्या कामांना गती मिळाली पाहिजे असे माझे मत आहे बरेचशे अडथळे आहेत. ते पार करून पुढे जाणार आहे. चांगली

कामे तातडीने कशी होतील, शहर चांगले कसे राहिल याकडे प्रयत्न चालु आहे.

श्री.रविकांत गवळी : सर्वे नंबर 12 सिटीएस 20155 ची पाच एकर जागा हि करोडो रुपयांची जागा आहे आज रोजी 33 वर्ष झालेले आहे महानगरपालिकेकडुन डिलीट करण्यासाठी मागणी करत आहे. कोर्टाचा स्टे असतांना लाखो रूपये लावण्यात आलेले आहे एका अधिकाऱ्याच्या चुकीमुळे. प्रशासकीय इमारतीचे रिर्झवेशन केलेले आहे. मध्यंतरी त्यांनी 20 बाय 30 चा प्रयत्न केला होता तो महानगरपालिकेने पाडुन टाकला. सदरील व्यक्ति एक एकर जागा देण्यास तयार आहे त्यास वाटाघाटी करीता प्रशासनाने बोलविण्यात यावे. त्यांनी वारंवार विनंती अर्ज केलेले आहे. सदरील जागा घेवुन डेव्हलप केली तर करोडो रूपयांची मालमत्ता होईल.

उप अभि.(न.र.)श्री.देशमुख : प्रशासकीय इमारतीचे रिर्झवेशन आहे. अकोमडेशन रिर्झवेशन करता येणार नाही.

श्री.रविकांत गवळी : गारखेडा येथे अशाच प्रकारचे अकॉमडेशन केलेले आहे.

उप अभि.(न.र.)श्री.देशमुख : शॉपिंग सेंटरमधे होती.

मा.सभापती : सर्वे नंबर 12 सिटीएस 20155 जी पाच एकर जागा आहे याबाबत काय अकोमोडेशन रिर्झवेशनमधे घेता येईल काय? काय काय कार्यवाही करता येईल याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना स्थायी समिती देत आहे.

श्री.प्रशांत देसरडा : 80 लाख रूपये मा.उच्च न्यायालयात का भरणा केली.

मा.सभापती : मा.उच्च न्यायालयाचा स्टे असतांना चुकीने पैसे भरले.

श्री.प्रशांत देसरडा : सदरील जागा खरेदी करायची असेल म्हणून पैसे भरलेले आहे.

मा.सभापती : 80 लाख रूपये आपण ज्या वेळी भरणा केली मा.उच्च न्यायालयाने सदर जागा महानगरपालिकेने ताब्यात घेऊ नये असे आदेश दिले. त्यानंतर जागा ताब्यात घेतली नाही. पेपर पजेशन झाले. 80 लाख रूपये कोर्टात जमा केलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : त्या केसमध्ये 4 वेळस महानगरपालिकेचा वकील हजर नसेल. कागदपत्र सादर केले नसेल.

मा.सभापती : या प्रकरणी सर्व अधिकार मा.आयुक्तांना देत आहे मा.आयुक्तांनी या प्रकरणी योग्य ते निर्णय घेवुन महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने इमारत बांधून देत असेल काही हरकत नाही.

श्री.प्रशांत देसरडा : शहराचा व्याप वाढलेला आहे शहराचा मध्यवती सेंटर जालना रोड झालेला आहे. त्यामुळे मनपाची खरी वास्तु त्या ठिकाणी असणे आवश्यक आहे.

मा.सभापती : सिटीएस नं.20155 सर्व्हे नंबर 12 एकुण जमीन 5 एकर 38 गुंठे याप्रकरणी स्थायी समिती मा.आयुक्तांना सर्व अधिकार देत आहे. मा.आयुक्त यांनी प्रकरणी महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने संबधीताशी वाटाघाटी करून योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार स्थायी समिती देते.

श्री.रविकांत गवळी : सन 1997 रोजी एका व्यक्तिने त्याची स्वःताची मालमत्ता महानगरपालिकेला देवुन टाकली त्याने त्या संबधी मोबदला मागीतला मोबदल्याची सर्व रितसर प्रक्रिया पुर्ण झाली. आज रोजी कोर्टाचा आदेश

असतांनासुध्दा काहीही कारवाई केली नाही. गारखेडा येथील गट नंबर 20/1 असा आहे वादिने महाराष्ट्र शासन, टाउन प्लॅनिंग आणि महानगरपालिका यांना प्रतिवादी केलेले आहे. कोर्टाचे आदेश आहे असे असतांना अंमलबजावणी होत नाही.

मा.सभापती : रिट पिटीशन 7739/08 या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने जे आदेश दिलेले आहे त्या प्रमाणे मा.आयुक्त यांनी कारवाई करावी. श्री.अबरारअहेमद मोहंमद इसाक बाबत मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे या प्रकरणी मा.आयुक्तांनी त्वरीत कारवाई करून संबधीतांना मोबदला देण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : कचऱ्या पासून खत निर्मीतीचा नारेगावचा जो प्रकल्प होता सत्यम फर्टीलायझर बाबतीत न्यायालयात प्रकरण चालू आहे काय, खुलासा देण्यात यावा.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

विधी सल्लागार : सत्यम फर्टीलायझर्स आणि महानगरपालिका यांच्या दरम्यान जो करार झाला होता आणि नंतर त्यांना टर्मिनेट केले. सदर प्रकरणातील करारात अर्बीट्रेशनचा क्लॉज असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने जस्टीज मुतालीक यांना अरबीट्रेटर म्हणुन नियुक्त केले होते. महानगरपालिकेच्या विरोधात त्यामधे निर्णय आल्यानंतर महानगरपालिकेतर्फे जिल्हा न्यायालयात अपिल केलेले असून त्यामधे स्टे आहे.

श्री.रविकांत गवळी : लवादाचा निर्णय अंतिम असतो काय?

विधी सल्लागार : निर्णय अपिलेबल आहे त्यामुळे तो जिल्हा न्यायालयामधे अपिल केलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : ॲग्रीमेंट करतांना एखादा लवाद घेतो त्याच्यात काही अडचण निर्माण झाल्यास लवाद कायम असतो काय?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : नाही.

विधी सल्लागार : अपिलची प्रोव्हीजन असल्यामुळे अपिल केलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे : लवादाने आपल्या विरोधात निकाल दिलेला आहे काय?

विधी सल्लागार : होय.

मा.सभापती : जस्टीस् मुतालिक यांनी महानगरपालिकेच्या विरोधात निकाल दिलेला आहे.

श्री.भगवान घडमोडे : लवादाने कुठल्या चुका/त्रुटी दाखविलेल्या आहेत.

विधी सल्लागार : सविस्तर माहिती मागवुन सांगण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : न्यायालयाचा निर्णय पुढील दोन चार वर्षांनी लागेल तोपर्यंत 12 टक्क्यांनी व्याज चालू आहे. दोन करोड रूपयांचे सहा करोड रूपयांची मागणी करत आहे. दोन वर्ष निकाल लावला नाहीतर तीच रक्कम दहा करोडमधे जाईल या करीता आज अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. सन 1997 ला ज्या पध्दतीने करारनामा केला होता त्यात सुविधा देवु शकलो नाही काय? दिरंगाई कुणामुळे झाली आहे का न्यायालयात जावे लागले. सत्यम फर्टिलायझर यांचा दावा अंशतः मंजूर करण्यात आला त्यांना 2 कोटी 27 लाख 37 हजार 476 प्रति वर्ष 12 टक्के व्याजासह दिनांक 03.11.2003 पासून रक्कम

मिळेपर्यंत तसेच कार्यवाहीचा खर्च म्हणुन रूपये 3 लाख 70 हजार लवादाची फी म्हणुन मनपाने द्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : प्रोजेक्ट चालू आहे काय?

मा.सभापती : प्रोजेक्ट बंद झालेला आहे. प्रशासनाने खुलासा करावा.

आरोग्य वै.अधिकारी : सत्यम फर्टिलायजरचा कारखाना मी येण्यापुर्वीपासूनच बंद होता. सदरची संचिका विधी विभागाकडे होती.

श्री.रविकांत गवळी : दिनांक 20.06.2008 ला लवादाचा निर्णय झालेला आहे या प्रकरणी तातडीने निर्णय घ्या 12 टक्के व्याज चालू राहणार.

श्री.भगवान घडमोडे : मा.आयुक्तांनी पुढाकार घेवुन मार्ग काढावा.

मा.सभापती :सत्यम बायो फर्टिलायझर प्रा.लि. यांचे बाजूने ट्रिब्युनलचे निवृत्त न्यायमुर्ती एस.जी. मुतालिक यांनी महानगरपालिकेच्या विरोधात निर्णय दिलेला आहे. या प्रकरणी महानगपालिका अपिलमधे गेलेली आहे. अपिलमधे महानगरपालिकेला स्टे मिळालेला आहे. परंतु न्यायमुर्ती एस.जी. मुतालिक साहेबांचा जो निर्णय आहे त्याप्रमाणे जोपर्यंत महानगरपालिका पैसे देत नाही तोपर्यंत 12 टक्के व्याजाने संबधीतास रक्कम अदा करायची आहे असे आदेश आहे. म्हणुन या प्रकरणी सत्यम बायो फर्टिलायझर प्रा.लि. यांनी मा.आयुक्त, मा.महापौर, सभापती, स्थायी समिती या सर्वांना निवेदन देवुन वाटाघाटीची तयारी दर्शविली आहे. म्हणुन या प्रकरणी सर्व अधिकार मा.आयुक्तांना देण्यात येते. मा.आयुक्तांनी महानगरपालिकेची आर्थीक बाजू आणि या सर्व बाबींचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.प्रशांत देसरडा : महाराष्ट्र शासनाने जकात रद्द करून महापालिकेस परिपत्रक दिले त्या बाबत आणि महानगरपालिकेची जकात बंद होणार आहे यास प्रशासनाचे मत काय आहे आणि शासनाचे निर्देश काय आहेत माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त(म) : जकात ऐवजी स्थानिक संस्था कर लावण्याचे महाराष्ट्र शासनाने अध्यादेश सप्टेंबर महिण्यात काढलेला आहे. त्या संदर्भात एक बैठक झाली आहे त्यात शासनाने मागील डाटा गोळा केलेला आहे. अध्यादेश काढलेला आहे प्रत्यक्षात नियम असे तयार झालेले नाहीत. नियम तयार करण्याचे काम शासन स्तरावर चालू आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्था कर अंमलबजावणी 1 एप्रिल 2010 नियोजित तारीख आहे. जो पर्यंत नियम तयार होत नाही तोपर्यंत कुठलीही माहिती सांगता येणार नाही.

श्री.भगवान घडमोडे : शासनाचे धोरण आहे की, तुम्हीच कमवा आणि खर्च करा.

मा.सभापती : मागच्या वर्षी जेव्हा जकात बंद करून उपकर लावण्यात आला त्यावेळेस 18 दिवस महानगरपालिकेस जकातही मिळाली नाही आणि उपकरही मिळाला नाही. सदरील मुद्दा महत्वाचा आहे त्यामुळे शासनाशी विचार विनिमय करणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री.प्रशांत देसरडा : रॅम्केला काँग्रेसने दिले.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : रॅम्केचा करार करण्यास सत्ताधारी पक्षाचा संबध आहे.

मा.सभापती : करारावर कॉग्रेस राष्ट्रवादी कॉग्रेसच्या एकाही सदस्यांची सही नाही. स्थायी समितीच्या सदस्यांनी 31.08.2009 रोजी सही केल्याचे मान्य करतात.

श्री.सतिष कटकटे : दिनांक 31.08.2009 रोजी सही केलेली आहे. रॅम्के केव्हा सुरू झालेले आहे माहिती देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : त्यावळेस विधानसभेची आदर्श आचारसहिता सुरू होती काय?

मा.सभापती : रॅम्के केव्हा सुरू झालेली आहे, करार केव्हा केला आहे त्याबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.नारायण कुचे : रॅम्केमुळे शहरात स्वच्छता होईल म्हणुन सहया केल्या होत्या.

मा.सभापती : करारनाम्यावर विरोधी पक्ष नेता किंवा सभापती म्हणून माझी सही असल्यास मी पदाचा राजीनामा देण्यास तयार आहे. करारनाम्यास माझा विरोध राहिलेला आहे.

(सभागृहात गोंधळामुळे काहीहि ऐकु येत नव्हते.)

मा.सभापती : स.सदस्य श्री.नारायण कुचे यांनी आरोप केलेला आहे की, विरोधी पक्ष नेता असतांना सही केलेली आहे खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता :करारनामा करतांना मा.सभापती यांची स्वाक्षरी नाही परंतु दोन स्थायी समिती सदस्यांच्या सहया आहेत.

मा.सभापती : सदस्यांचे नांवे सांगण्यात यावे. दोन्ही सदस्यांची स्वाक्षरी 31.08.2009 रोजी आहे काय? ज्यावेळेस स्थायी समितीमते बजेट सादर केले त्यावेळेस स्थायी समितीने रॅम्केसाठी कुठलिही तरतुद ठेवलेली नाही. स्थायी समितीने रॅम्केचा प्रस्ताव रद्द केलेला आहे. त्यास शासनाने अद्यापपर्यंत विखंडीत केलेले नाही. जोपर्यंत शासन सदर प्रस्तावास विखंडीत करत नाही तोपर्यंत रॅम्केस काम करू दिले जाणार नाही.

श्री.सतिष कटकटे : 31-8-2009 ला सह्या केल्या. रॅम्केस कार्यादेश केव्हा देण्यात आला. कार्यादेश अगोदर दिले.

अति.शहर अभियंता : रॅम्केला कार्यादेश दिनांक 07.11.2008 रोजी देण्यात आला. स्थायी समितीच्या सदस्यांची स्वाक्षरी दिनांक 31.08.2009 रोजीची आहे.

श्री.सतिष कटकटे : कोणत्या अटी शर्तीच्या अधिन राहून त्यांना करार देण्यात आला. दि.02.12.2008 रोजी सबमिशन लिहिले होते की, वरील सर्वबाबीचा सखोल विचार करता प्रकल्प राबविणे मनपाला शक्य नाही.

अति.शहर अभियंता : त्यावर प्रशासकीय निर्णय असा झाला की, एवढी मोठी मशीनरी खरेदी करू शकत नाही. एमएसडब्ल्यु 2000 रूल प्रमाणे महानगरपालिकेतर्फे काम होणार नाही. सुप्रिम कोर्टाचे आदेश आहे की, एमएसडब्ल्यु 2000 प्रमाणे काम व्हावे. सर्वसाधारण सभेने जो निर्णय घेतला होता आणि स्थायी समितीने त्यास मंजूरी दिली होती त्यानुसार काम सुरू झालेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : सत्यम, स्पेक व्यवस्थित चालवले असते तर पैसे देण्याची गरज नव्हती. रॅम्केमधे त्यांच्या सोईनुसार करार केलेला आहे. दि. 28.05.2008 रोजी स्थायी समितीने करारनामा रद्द केलेला आहे. संचिकेवर लिहिण्यात आले आहे की, ज्या स्थायी समितीने निर्णय रद्द केलेला आहे. त्यास मंजूरी द्यायची असेल तर शासनाकडे विखंडीत करण्याकरीता पाठविण्यात यावा. रॅम्केने जर व्यवस्थित काम केले नाही आणि त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रयत्न केला तर रॅम्केचे म्हणने होईल की, हा करारनामा चुकीचा आहे. स्थायी समितीने

करारनामा रद्द केला होता शासनाची मंजूरी घेतली नाही. सासवड नगरपरिषदेची कचरा कुंडी या ठिकाणी ठेवण्यात आली आहे. टेंडरमधे 4.50 लाखाची रिक्शा देण्यात यावी परंतु जी रिक्शा फिरत आहे ती 1.50 लाखाची रिक्शा आहे. त्या सुविधाची रिक्शा नाही.

श्री.सतिष कटकटे : मुख्य लेखापरिक्षक आणि विधी सल्लागार यांनी रॅम्केबाबत अहवाल दिला होता. रॅम्केचे कार्यादेश चुकीचे आहे दि.26/8/2008 ला मुख्य लेखा परिक्षकांनी अहवाल दिलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : रॅम्केबाबत मुख्य लेखा परिक्षक यांनी दिलेल्या अहवालाबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : रॅम्के कंपनी बाबत सर्व अभ्यास करून निर्णय घेणेकरीता मा.आयुक्तांनी मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाधिकारी, विधी सल्लागार, अति.शहर अभियंता यांची समिती गठीत केली होती त्यांनी अहवाल सादर केला आहे. 1) सदरील प्रकल्पावर प्रति वर्षी साधारण 11 कोटी खर्च होणार असून या शिवाय रस्ते सफाई नाले सफाई महानगरपालिकेत वेगळा खर्च करावा लागेल. हि बाब महानगरपालिकेची आर्थीक स्थिती पहाता परवडणारी नाही असे नमुद करण्यात येते आज रोजी नाशिक महापालिका मुख्य लेखापरिक्षक यांना दुरध्वनी वरून विचारणा केली असता याच कामाकरीता त्यांनी आठ कोटीचे कंत्राट दिलेले आहे. औरंगाबाद शहरासाठी तीन कोटी जास्तीचे देणे योग्य होणार नाही. 2) स्थायी समिती सभा दिनांक 25.05.2005 विषय क्रमांक 31 व दिनांक 15.11.2008 रोजी सदरील करार तात्काळ रद्द करावा असे सुचविले आहे. 3) करारावर महानगरपालिकेच्या वतीने मा.आयुक्तांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे ती घेतलेली नाही. 4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधे परिशिष्ट घ, प (1) नुसार करारपत्रावर स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. 5)करारपत्राच्या अटीनुसार मनपाचे कर्मचारी सदरील कंत्राटदाराच्या कामासाठी वापरणे हि बाब धोरणात्मक असल्याने अधिनियमातील कलम 51 नुसार मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे ती घेण्यात आलेली नाही. 6) कचरा व्यवस्थापन बाबत कचरा नेमका कुठे जमा करणार याबाबत स्पष्टता नाही.

मा.सभापती : विधी सल्लागार यांचाही अभिप्राय वाचुन दाखविण्यात यावा.

अति.शहर अभियंता : 1) सदरील करारनामा रजिष्ट्रेशन ॲक्ट 1908 प्रमाणे रजिष्टर झालेला नाही. 2) सदरील करारनामा बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट 1958 मधील तरतुदी नियमाप्रमाणे आवश्यक असणारी स्टॅम्प डयुटी देवुन अंतिम करण्यात आलेला नाही. 3) सदरील करारनामा केव्हा करण्यात आला याबाबत तारीख टाकण्यात आलेली नाही. 4) सदरील करार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 73 अन्वये करण्याचे अधिकार अतिरीक्त शहर अभियंता यांना सदरील अधिनियमाचे कलम 69 प्रमाणे मा.स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेने प्रदान करण्यात आले आहे असे दिसुन येत नाही.

5) सदरील करारावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे परिशिष्ट अनुसूची ड प्रकरण 5 चे नियम 1 (2) प्रमाणे महानगरपालिकेचे सामान्य मुद्रा लावण्यात आलेले नाही. तसेच त्यावर मा. स्थायी समितीचे दोन सदस्यांच्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात आलेली आहे. याचे दर्शक म्हणुन सहया करण्यात आलेल्या नाही. सदरील करार रॅम्के इन्वायरमेंटल इंजि. लि. व अति. शहर अभियंता यांच्या दरम्यान झाल्याचे दिसुन येते. यावर त्याचे पदनाम देण्यात आलेले आहे परंतु त्याचे नांव लिहिण्यात आलेले नाही तसेच साक्षीदाराच्या यादीत मा.आयुक्तांचे स्वाक्षरीत परंतु नांव नाही. करारनामा कुणासोबत झाला व साक्षीदार कोण होते त्याचे नांवे नसल्याने फक्त पदनामावरून याचा बोध होत नाही तसेच मा.आयुक्त त्यावेळेस उपस्थित होते तर त्यांचे तर्फे करारनामा होणे योग्य होते. 7) असे नमुद करण्यात येते की, करारनाम्याचे प्रारूप, मसूदा विधी सल्लागाराकडुन अंतिम करण्यात आल्यानंतर त्यातील परिच्छेत क्रमांक 15 मधे बदल करण्यात आलेला आहे जो मनपास हितकारक नसुन नुकसानकारक आहे व हि अतिशय गंभीर बाब आहे. 8) सदरील प्रकरण मा.स्थायी समितीने एकमताने सदरचा करार दोन वेळेस रद्द करण्याचे आदेश पारित केलेले आहे. त्यात निविदेचा कालावधी 7 वर्षाचा असून तो नंतर 10 वर्षांचा करण्यात आलेला आहे असे नमुद करण्यात आले होते. स्थायी समितीने पारित केलेला ठराव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 451 प्रमाणे विखंडीत करण्याकरीता कारवाई केलेली नसल्याचे सध्या स्थितीत मा.स्थायी समितीने पारित केलेला ठराव कायम आहे. 9) Agreement is not a contract and it is void Ab intio there for it is not enforceable Agreement त्यामुळे सदरील कराराची पुर्तता करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही कारण हा करार अस्तित्वात नाही. 10) कचऱ्यांची विल्हेवाट करण्यासाठी आवश्यक असणारी जागा तसेच दयावयाची 1 एकर जागा उपलब्ध असल्याचे दिसुन येत नाही. सदरचे काम फक्त डोअर टु डोअर पुरते मर्यादित आहे. नाले, गटारे इत्यादि साफसफाईचे करण्याचे अंतर्भुत नाही. त्यामुळे कामाचा अतिरिक्त कार्यभार महानगरपालिकेवर पडेल.

श्री.प्रशांत देसरडा : मुख्य लेखापरिक्षक आणि विधी सल्लागार यांचेकडुन अहवाल आलेला आहे त्याची पुर्तता केली काय?

अति.शहर अभियंता : अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व मुद्दांचा समितीमधील जे प्रतिनिधी होते त्या मुद्दांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे आणि त्या प्रमाणे निर्णय घेतलेला आहे. एक अट जी होती ती अक्टनुसार तो रजिष्ट्रेशन करायला पाहिजे ती बाब शिल्लक आहे. रजिष्ट्रेशन करण्यासाठी रॅम्के कंपणीस प्रशासनातर्फे पत्र देण्यात आले आहे. रजिष्ट्रेशन रॅम्केकडुन करून घेतले जाईल.

श्री.प्रशांत देसरडा : सर्व पुर्तता झाली म्हणुन कमिटीतील सर्व सदस्यांनी सहया केलेल्या आहेत. जो करार रद्द केला आहे तो शासनाकडे विखंडीत करण्याकरीता पाठविण्यात आला आहे.

अति.शहर अभियंता : सर्व सदस्यांनी सहया केलेल्या आहेत तसेच करार विखंडीत करण्याकरीता शासनाकडे पाठविला आहे.

श्री.प्रशांत देसरडा : करार Continue केला तर प्रशासन काय करणार?

अति.शहर अभियंता : महाराष्ट्र शासनाने सदरील प्रकल्पाला मंजूरी देण्यात आलेली आहे.

मा.सभापती : कोणत्या वर्षी मंजूरी दिली आहे.

अति.शहर अभियंता : सन 2007-2008मध्े मंजूरी दिली आहे.

श्री.प्रशांत देसरडा : शासनाने जी मंजूरी दिली ती स्थायी समितीच्या ठरावाच्या अगोदर आहे का? शासनास कळविण्यात आले आहे का की, ठराव स्थायी समितीने रद्द केलेला आहे.

श्री.सतिष कटकटे : प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : शासनाने मंजूरी दिल्या बाबतचे पत्र दाखविण्यात यावे.

अति.शहर अभियंता : मंजूरीचे पत्र स.सदस्यांना दाखविण्यात आले.

मा.सभापती : शासनाला ठराव, अॅग्रीमेंट करण्याचा अधिकार नाही.

अति.शहर अभियंता : महाराष्ट्र शासनाने रॅम्केच्या निवेदेच्या मंजूरी बाबत दिनांक 09 जुलै 2009 रोजी महानगरपालिकेस पत्र दिले ते पत्र सभागृहात वाचुन दाखविण्यात आले.

श्री.सतिष कटकटे : कर्मचारी वर्ग बाबत मंजूरी घेतली होती काय?

अति.शहर अभियंता : सर्वसाधारण सभेत ज्या वेळी प्रकल्प सादर केला होता त्याच वेळी महानगरपालिकेतील कर्मचारी (मजूर) वर्ग होतील अशी मंजूरी त्याच वेळी प्राप्त झालेली आहे.

श्री.रविकांत गवळी : नाशिक महानगरपालिका पैक्षा औरंगाबाद महानगरपालिकेत 3 कोटी जास्त दराने करार केला आहे, सात वर्षाचा करार असतांना दहा वर्षाचा करतो त्याबाबत मान्यता घेणे आवश्यक नव्हते का?

श्री.प्रशांत देसरडा : जी पुर्तता करायला पाहिजे होते ती पुर्तता करण्यात आलेली नाही. शासनाची बॉन्ड डयुटी भरणा केली नाही. करारनाम्यातील बॉन्ड डयुटी बुडविण्यात आली आहे त्यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करायला पाहिजे होता. सहकार एजन्सीनेही बॉन्ड डयुटीची भरणा केलेली नाही. स्थायी समितीने पाठविलेला ठराव शासनाने Continue केला आणि त्याची असलेली सर्व Invesment वर ग्राहक मंचामधे जावुन महानगरपालिकेविरुध्द केस करेल्. जर रॅम्केने काम बरोबर केले नाही तर प्रशासन काहीच करू शकणार नाही कारण कराराची पुर्तता झालेली नाही. तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब यांनी दिलेल्या अहवाला बाबत तसेच करारात खाडाखोड झाली याबाबतीत विचारणा केली नाही. वार्ड अधिकाऱ्यांना रॅम्केने कुठले काम करायचे याबाबत वार्ड अधिकाऱ्यांना याबाबतची माहिती नाही. पुर्ण पुर्तता करून रॅम्केला काम द्यायला पाहिजे होते. रॅम्केचे कर्मचारी आमचे कर्मचारी रॅम्के घेत नाही म्हणुन मोर्चा काढुन तंबु टाकण्यात आला. प्रशासनाने सदरील कर्मचाऱ्यांना आत्ताच बोनस,ॲडव्हान्स देण्यात आले सदरील कर्मचारी

रॅम्केकडे वळती होणार हा वादाचा विषय आहे. प्रशासनाने कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे. बॉन्ड डयुटी चुकविणे हा गुन्हा आहे. रॅम्केचे नाव ऐकुन शहरात स्वच्छतेचे चांगले काम होईल अशी आशा होती. स्पेकच्या करारनामा चांगला होता परंतु त्याचे Implement व्यवस्थितरित्या केले गेले नाही. ठराव विखंडीत करून प्रशासनाने काम केले पाहिजे होते. या सर्व गोष्टीस प्रशासन जबाबदार राहणार आहे. सात वर्षाचा करार असतांना दहा वर्षाचा करतो त्याबाबत मान्यता घेणे आवश्यक नव्हते का? मुख्यलेखापरिक्षक विधी सल्लागार यांनी जे मुद्दे काढलेले आहे त्याची बांधणी व्यवस्थीत होत नाही तो पर्यंत रॅम्केचाकरारनामा करायला पाहिजे नव्हता.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा की, स्थायी समितीने ठराव केव्हा रद्द केला.

अति.शहर अभियंता : दिनांक 28.05.2008 रोजी ठराव रद्द केलेला आहे.

मा.सभापती : शासनाकडे विखंडीत करण्यासाठी केव्हा पाठविला आहे.

अति.शहर अभियंता : दिनांक 23.09.2009 रोजी शासनाकडे पाठविला आहे.

मा.सभापती : कार्यादेश केव्हा देण्यात आले.

अति.शहर अभियंता : दिनांक 30.09.2009 रोजी काम पुनःश्च सुरू करणेस.

मा.सभापती : एखादा ठराव सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समितीने रद्द केला तो विखंडीत करण्याचा अधिकार प्रशासनाला किती वेळ आहे.

अति.शहर अभियंता : समिती सदस्यांनी त्यांच्या सहयानिशी मुद्दे मांडलेले आहे.

श्री.सतिष कटकटे : कंपणी तर्फे पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही म्हणुन लिहिले आहे.

श्री.भगवान घडमोडे : विधी सल्लागार, मुख्यलेखा परिक्षक याचा अहवाल तसेच स.सदस्य जे मुद्दे मांडतात ते यासर्व बाबतीत मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त : हे सर्व मुद्दे समोर आल्यानंतर फाईनल नोटींग काय होते आणि ते कशाच्या आधारे घेतले ते अतिरिक्त शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : मा.आयुक्तांनी अतिरिक्त शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाधिकारी व विधी सल्लागार यांची समिती गठीत करून या प्रकल्पाबाबत वस्तुनिष्ठ अहवाल देणे बाबत निर्देश दिले असता या पैकी मुख्यलेखापरिक्षक यांनी आक्षेपार्य मुद्दे उपस्थित केले की, प्रती वर्षी होणारा खर्च 11 कोटीचा आहे हि बाब आर्थिक स्थिती पहाता परवडणारी नाही. सरासरी 11 कोटीचा खर्च वार्षिक करार खर्चानुसार सातव्या वर्षापासून होणार आहे. त्यामुळे मुद्दा संयुक्तिक नाही. नाशिक महानगरपालिकेने याच कामकरीता आठ कोटीचे कंत्राट दिलेले आहे त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने जास्तीचे तीन कोटी देणे संयुक्तिक वाटत नाही. नाशिक महानगरपालिकेस सध्या एमएसडब्ल्यु-2000 नियमानुसार घनकचरा हाताळणी व व्यवस्थापन होत नसुन साध्या टॅक्टरने कचरा उचलण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रकल्पाची तुलना करणे योग्य वाटत नाही. 3) स्थायी समिती सभेने 25.05.2008 व दिनांक 15.11.2008 रोजी सदरील करार तात्काळ रद्द करावा असे सुचविले एकदा सर्वसाधारण सभेने व स्थायी समितीने प्रकल्पास मंजुरी दिल्यावर धोरणात्मक निर्णय हा सर्वसाधारण

सभेचा फेर बदल करण्याचा अधिकार आहे तथापी स्थायी समितीने घेतलेला निर्णय शासनाकडे पाठवुन विखंडीत करण्याचे प्रयोजन आहे.

मा.सभापती : प्रयोजन दाखविण्यात यावे. शासनाने ठराव विखंडीत केला आहे काय?

अति.शहर अभियंता : 451 मधे पाठविले आहे स्पेसिफिक वेळ त्या कलमामधे नमुद नाही.

मा.सभापती : शासनाने विखंडीत केले नसल्यामुळे तसे काम करण्याचे अधिकार आपणांला आहे काय?

अति.शहर अभियंता : स्थायी समिती सभेने 25.05.2008 व दिनांक 15.11.2008 रोजी सदरील करार तात्काळ रद्द करावा असे सुचविले एकदा सर्वसाधारण सभेने व स्थायी समितीने प्रकल्पास मंजुरी दिल्यावर धोरणात्मक निर्णय हा सर्वसाधारण सभेचा फेरबदल करण्याचा अधिकार आहे.

मा.सभापती :एजन्सी फिक्स करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला आहे काय?

अति.शहर अभियंता :अधिकार स्थायी समितीला आहे.

मा.सभापती :ॲग्रीमेंट रजिष्टर नसतांना काम कसे देण्यात आले.

अति.शहर अभियंता :रजिष्ट्रेशन करण्यासाठी वेळ लागला एक वर्षापासुन रॅम्केला काम करण्याची अनुमती दिली नव्हती.

मा.सभापती : रजिष्ट्रेशनच्या पुर्वी काम करण्याची प्रशासनास घाई का होती खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता : रॅम्केकडुन रजिष्ट्रेशन करून आणि स्टॅम्प डयुटी भरुनच घेणार आहोत.

श्री.सतिष कटकटे : याबाबतीत वार्ड अधिकाऱ्यांचा अहवाल मागविण्यात आला होता का?

अति.शहर अभियंता : सदरील प्रकल्प सुरू करण्याच्या अगोदर प्रकल्प कसा करायचा कसा राबवियाचा याबाबतीत सर्व वार्ड अधिकाऱ्यांच्या चित्रफित दाखवुन त्यांच्या सुचना घेवुन मग हा प्रकल्प तयार झाला.

श्री.नारायण कुचे : रॅम्केचा करार रद्द करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : करार रद्द करण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : टेक्निकल अडचणी निर्माण झाल्यास त्यास प्रशासन सक्षम आहे का?

मा.आयुक्त : सदरचा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे गेल्या दोन वर्षापासून सदरचा विषय गाजत आहे यावर प्रकाशझोत टाकला पाहिजे निर्णय जो असेल तो घेण्यात यावा. सन 2000 साली मा.सुप्रिम कोर्टाच्या ऑर्डर मिळाल्यात भारत सरकारचे वन आणि पर्यावरण मंत्रालयाच्या नोटिफिकेशन नुसार 25 सप्टेंबर 2000 चे नोटिफिकेशन निघाले त्यानुसार सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटची संकल्पना आली. या संकल्पनेनुसार दोन चार बाबी निघाल्या होत्या की, जेथुन जो कचरा उचलला जाईल तो डायरेक्ट ट्रेंचिंग ग्राउंड पर्यंत गेला पाहिजे. पुढचे मुद्दे त्याच्यावर प्रोसेसिंग असली पाहिजे. जो कचरा उचलला जातो त्याची मानवी हाताळणी होता कामा नये तो जास्तीत जास्त मशनरीच्या साहयाने उचलला जावा जेणेकरून त्या लोकांच्या आरोग्याला धोका होणार नाही. जड बंद वाहनातुन याची वाहतुक करावी घरोघरी कचरा गोळा करावा. अशा प्रकारच्या सुचना देण्यात आल्या होत्या. यानुषांगाने सर्व महानगरपालिका,नगरपालिका,देशपातळीवर कंम्पलसरी करण्यात आले होते त्याचा टाईमपीरेड ठरवुन दिले होते. 31-12-2007 पर्यंत करावे अशी

लिमीट वाढून दिली होती 31.12.2007ची अंतिम मुदत त्यास होती. जे कोणी करणार नाही त्यांचेवर पेनॅल्टी लावण्यात आलेली आहे ते कायद्यानुसार आहे. कलम 15, 16, 17 अन्वये जो कोणी यामधे काम करणार नाही त्यांना फाईन व कैद, पाच लाखापर्यंतचा दंड किंवा एक वर्ष कारावास देण्याच्या तरतुदी आहेत. त्यामधे प्रशासकीय अधिकारी म्हणुन महापालिका म्हणुन दंड होऊ शकतो. अशा संकल्पना होत्या म्हणुन भारतभर हा कार्यक्रम सर्वांनाच देण्यात आला यामधे जी कार्यवाही आपल्या स्तरावर झाली यामधे सर्व कार्यवाही ही मी येण्यापुर्वीचीच होती. रॅम्केला त्याच वेळेस फिक्स करण्यात आले होते. रॅम्क्चो करारनामा त्याचवेळेस करण्यात आलेला होता. वर्क ऑर्डर त्याच वेळेस देण्यात आले होते. रजिष्ट्रेशन झाले नाही, या मुद्दयाबाबत संचिकेवर लिहिले आहे. स्टॅम्प डयुटी भरलेली नाही हा मुद्दा होता तेही करणे आवश्यक होते. हे सर्व करत असतांना माझ्या समोर जे आले केंद्राच्या, राज्याच्या आणि मा.सुप्रिम कोर्टाच्या सुचना पहाणे आवश्यक होते तसेच जी झालेली कार्यवाही तसेच रॅम्केचा ठराव सर्वसाधारण सभेने पारित केलेला होता. सविस्तर माहिती देण्यात येते. घनकचरा व्यवस्थापनाचा धोरणात्मक निर्णय हा 6 ऑक्टोबर 2006 रोजी घेण्यात आला. पीएमसी म्हणुन ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हमेंट नेमणुक करण्यास स्थायी समितीने दिनांक 06.02.2007 रोजी मान्यता दिली. ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हमेंन्टने नऊ कोटी तेरा लाख रूपयांचा प्रकल्प अहवाल आपल्याला सादर केला. हा प्रकल्प अहवाल सर्वसाधारण सभेने दिनांक 20.06.07 रोजी विषय क्रमांक 839 अन्वये स्थगीत ठेवला तथापी 18.07.2007 रोजी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 963 अन्वये मंजूरी घेण्यात आली. दिनांक 18.08.2007 रोजी जाहीर सुचना प्रसिध्द करण्यात आली दिनांक 13.09.2007 रोजी दाखल करण्याचा कालावधी होता. दिनांक 03.09.2007 रोजी बैठक घेण्यात आली त्यात निवीदेचा कालावधी सात वर्षाऐवजी दहा वर्षांचा करण्यात आला. दिनांक 10.09.2007 रोजी दुसरी प्रीमिटींग घेण्यात आली आणि वाहनावरील नियंत्रणासाठी जीपीआरएस सिस्टीम बसविण्या विषयी व इतर काही निर्णय त्यात घेण्यात आले. प्राप्त निवीदे सुचनेनुसार एकच निवीदा प्राप्त झाली होती म्हणुन 19.09.2007 दुसऱ्यांदा निवीदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही झाली आणि 05.10.2007 पर्यंत मुदत देण्यात आली. चार निवीदा प्राप्त झाल्या त्यातील दोन अपात्र व दोन पात्र होत्या एक ॲन्थोनि बेस्ट हॅन्डमिक्स इन मुंबई यांची 111 कोटींची निवीदा होती तर रॅम्केची 110 कोटींची निवीदा होती. तत्कालीन आयुक्तांनी रॅम्केस वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले आणि 108 कोटींची दहा वर्षासाठीची करण्याचे ठरले. सदर दरास स्थायी समितीची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव गेला असता विषय क्रमांक 291 अन्वये 31.02.2007 अन्वये प्रकल्पाची मुदत ठरविण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला असल्याकारणाने प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला. सर्वसाधारण सभेने दिनांक 31.01.2008 रोजी विषय क्रमांक 64 अन्वये दहा वर्ष कालावधी करण्यास

मंजूरी आणि प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यात आला. स्थायी समितीची बैठक दिनांक 05.02.2008 अन्वये विषय क्रमांक 334 अन्वये रॅम्केची दहा वर्ष मुदतीची 108.5 कोटी रूपयांची खर्चाची निवीदा मंजूर केली.स्थायी समितीची दिनांक 28.05.2008 रोजीच्या बैठकीत विषय क्रमांक 31 अन्वये निवीदा कालावधीत बदल झाल्याकारणाने निवीदा रद्द करण्याचा ठराव पुर्णनव्याने घेण्यात आला. पहिल्यांदा निवीदा स्थायी समितीने मंजूर केलेली आहे. दरम्यान निवीदा प्रक्रिया संदर्भात शासन स्तरावर विचारणा करण्यात आली तक्रारी करण्यात आल्या शासनाने दिनांक 09.06.2008 रोजी रॅम्केची निवीदा स्विकारण्यास हे सर्व पाहिल्यानंतर शासनाने मंजूरी दिली. आयुक्त,पदाधिकारी आणि रॅम्केचे प्रतिनिधी यांची चर्चा तत्कालिन आयुक्त, मा.विभागीय आयुक्त श्री.बंड साहेब दिनांक 19.02.2008 रोजी चर्चा झाली त्यात असे ठरले की, वाहन चालक आणि मजूर दहा वर्षांसाठी रॅम्केकडे द्यायचे आणि त्यांचा पगार रॅम्केच्या मासिक बिलातुन वजा करायचा. सदरील कॅलक्युलेशन केल्यास मजुरांचा पगार आज रोजी साडेसहा कोटी रूपये आहे तो रॅम्केकडे वर्ग करीत आहे. हे दर वर्षी तीन टक्के वाढत जाणार आहोत दहा वर्षांचा सरासरी 10 कोटी प्रत्येक वर्षी राहणार आहेत. आज रोजी मजूरांचा पगार 6.50 कोटी आहे आणि उरलेली रक्कम रॅम्केला देणार आहोत. त्यामधे त्यांची मशनरी, कॉम्प्रेसर आणि इतर ज्या बाबी आहे त्या असणार आहेत. जनतेत अपप्रचार झालेला आहे रॅम्केस 10 कोटी दरवर्षी देणार आहे मनपाचे मजूर हे मनपाच्या आस्थापनावरच राहणार आहे त्यांचा पगार रॅम्केच्या बिलातुन वजा करणार आहे. सदरील करार हा दहा वर्षाचा आहे त्यास शासनाची मंजूरी आहे मा.सुप्रीम कोर्टाची बॅकींग आहे. पोल्युशन कंट्रोल बोर्डाची नोटीस मिळालेली होती प्रशासनावर तसेच महापालिकेवर कारवाई का करण्यात येवु नये म्हणुन कारवाई होण्याची शकयता नाकारता येत नव्हती. या सर्व पार्श्वभुमीवर झालेला करार आर्थीक बाजु या सर्व बाबी पाहिल्यावर लिगल इश्युंची तपासणी केली. पुर्वीच्या सर्व बाबींची कायदेशीर तपासणी केली. दिनांक 07.11.2008 रोजी कार्यारंभ आदेश दिल्यानंतर त्यांनंतर महापालिकेस नोटीसा सुरू झाल्या की, कार्याआरंभ आदेश दिल्यानंतर त्यांनी दहा ते बारा कोटींच्या मशनरी खरेदी केलेल्या आहेत आम्हास काम करण्याची संधी द्या नाहीतर न्यायालयात जावे लागेल. एका बाजुला मा.सुप्रीम कोर्टाचे आदेश, आम्हाला मिळालेली बोर्डाची नोटीस आणि रॅम्केची नोटीस या सर्व पार्श्वभुमीवर आणि एक मुद्दा म्हणजे मी रूजु झाल्यापासुन सफाईचे काम मी सतत पहात होतो. माझा असा दावा आहे की, 2000 सफाई मजूरांची आवश्यकता नाही यापैक्षा कमी संख्या पाहिजे होती परंतु महापालिका काही लोकांना पोसत आहे. काही कंत्राटदरांनी पोसले, जेव्हा त्या लोकांच्या हजेरांची तपासणी केली रस्त्यावर उतरलो सकाळी तीन तीन तास सर्व अधिकाऱ्यांना कामाला लावले. प्रत्येक ट्रॅक्टर कचरा गाडीमागे एक अधिकारी याप्रमाणे 55 अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. दोन महिणे सतत त्यांचे पाठीमागे होतो. एका बाजुला कोर्टाचे आदेश

होते दुसरीकडे दोन ते तीन महिणे सफाईची पहाणी केली, रॅम्के आणि कंट्रोल बोर्डाच्या नोटीसा मिळाल्या त्यामुळे जमेल तेवढे लिगल करण्याचा प्रयत्न केला. सफाई करणे अत्यावश्यक आहे कारण इतर ठिकाणी सुरू झालेले आहे. कचरा नेऊन टाकणे हि पहिली स्टेप आहे त्यानंतर त्यावर प्रोसेसिंग करणे कंपोस्टिंग करणे त्याच्यावर विज निर्माण करणे हा प्रोजेक्ट पुढे जायचे आहे. यासाठी अंतिम मुदत 31.07 हि होती. म्हणुन सर्व गोष्टींची तपासणी करून सदविवेक बुध्दीला जे पटले ते केले छोटयामोठया ज्या बाबी राहिल्या त्यापुर्ण करून घेतल्या पाहिजे. रॅम्केसही याद्वारे इशारा देवु इच्छितो, अटी शर्ती अंतिमरित्या झालेल्या नाहीत ज्या दिवशी अंतिम होईल. प्रशासनास करार रजिष्टर्ड करण्याचे तसेच स्टॅम्प डयुटी भरून घेण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या् परंतु प्रशासनाची गती कमी असल्याकारणाने उशीर लागत आहे. हया सर्व गोष्टी होणार आहे. रॅम्केने जे प्रपोज केले होते ज्या मशनरी येणार होत्या उदा. रिक्शा, कॉम्पॅक्टर व इतर मिळणार होते त्याचा पाठपुरावा सुरू आहे. जेव्हापासुन आदेश दिले ज्या भागात त्यांनी काम केले नाही त्यांना त्याची रक्कम दिली जाणार नाही. ज्यादिवशी त्याचे संपुर्ण काम सुरू होईल त्या दिवशीपासुन त्यास रक्कम दिली जाईल. रॅम्केने 571 मजूरांची मागणी केली होती त्यास 412 मजूर आणि 35 वाहनचालक दिले आहे. अजूनही 120 मजूर त्यास दयावयाचे आहे. यापैकी कोणताही मजूर घरी जाणार नाही हे पहाणार आहे. मजूरांनी काम केले पाहिजे जेव्हा मी तपासणी केली 50 टक्के मजूर गैरहजर सापडले. अनेक मजूर हे बोगस होते ते येतच नव्हते. अशी सिस्टीम किती दिवस चालू दयायचे म्हणुन कठोर निर्णय घेण्याची गरज होती म्हणुन तो घेण्यात आला. एवढे सर्व करूनही कचरा निट भरणे, फावडयांचा वापर करणे हे सर्व गोष्टीं व्यवस्थित होत नव्हत्या म्हणुन माझा पुन्हा असा दावा आहे की, रॅम्के सुरू झाले की कोर्टाचा अवमान होणार नाही याकडे पाहिले. मजूरांच्या आरोग्याकडे पहाण्यात आले. सफाईबाबत रॅम्केस आवश्यकता पडल्यास दंड केला जाईल. अटी आणि शर्तीनुसार त्यांचेकडुन काम करून घेतले जाईल योग्य ती कारवाई करण्यात येईल. शहरवासीयांना विश्वास द्यायचा आहे की, एक कठोर निर्णय घेण्यात आला ज्या आयुक्तांनी दोन वर्षामधे निर्णय घेतला नाही तो मी घेतला आहे. यामधे काही त्रुटी असु शकतील त्या दुर करण्याचा प्रयत्न केला जाईल. शहरात पडलेला कचरा, ओला सुका कचरा वेगळा करणे त्यावर प्रोसेसिंग करणे या सर्व गोष्टी तसेच बऱ्याच दिवस चालणारा हा प्रोजेक्ट आहे तो महानगरपालिकेचा भाग बनलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : मा.सुप्रिम कोर्टाचे तसेच पोल्युशन कंट्रोल बोर्ड यांचे म्हणण्यानुसार कचरा हाताळणीत कमीत कमी मानवी वापर झाला पाहिजे. शासनाच्या नियमाप्रमाणे सदरील टेंडर देण्यात आले. परंतु टेंडर देत असतांना आज रोजी रॅम्केने जी यंत्र सामुग्री लावयला पाहिजे ती लावली आहे काय? ज्या पध्दतीने नॉर्मस् ठरवुन दिले होते त्यापध्दतीने काम सुरू नाही. जागा उपलब्ध नाही.

मा.आयुक्त : नारेगावच्या जागेचा महत्वाचा प्रश्न आहे, त्यासाठी दोन वेळेस जिल्हाधिकारी आणि मा.विभागीय आयुक्त यांचेकडे बैठक झाली आहे. कमिटी नेमण्यात आली आहे त्या कमिटीने जागेची पहाणी केली दिनांक 05 तारखेस बैठक लावण्यात आलेली आहे

अति.शहर अभियंता : रॅम्केकडुन जे काम सुरू करण्यात आलेले आहे अटी शर्तीनुसार जी सामुग्री पुरविण्याची बाईंडिंग केलेली आहे त्याप्रमाणेच आपल्या स्पेसिफिकेशन नुसारच सामुग्री घेणार आहोत. हया महिण्याच्या कालावधीमधे काही रिक्शा त्यांनी आणल्या होत्या त्या चेक केल्या. त्या आपल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे नाहीत म्हणुन त्या रिजेक्ट केल्या. आता त्यांनी नागपुर येथील एरोस कंपणी येथे रिक्शा तयार करण्यासाठी टाकलेल्या आहेत. त्याचे एक सॅम्पल 05 तारखेस दाखवयला आणेल ते अप्रुव्ह झाल्यानंतर बाकीच्या रिक्शा आणण्यात येतील.

श्री.रविकांत गवळी : आदर्श आचारसंहिता चालू असतांना मा.जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेवुन काम चालु करण्याची घाई प्रशासनास का वाटली. गेल्या नऊ महिण्यांपासुन रॅम्केस माहित असतांना त्यांनी यंत्रसामुग्री का तयार ठेवण्यात आली नाही.

श्री.नारायण कुचे : करारनाम्या प्रमाणे कचराकुंडया ठेवण्यात आलेल्या नाहीत. मिनीट्रक, सायकल रिक्शा 57, घरोघरी कचरा गोळा करण्यासाठी घंटा गाडया हि सर्व यंत्रसामुग्री आणलेली नाही.

अति.शहर अभियंता : रॅम्के कंपणीने आज रोजी शहरात जी यंत्रसामुग्री उपलब्ध केली आहे त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

श्री.नारायण कुचे : करारनाम्याप्रमाणे प्रत्यक्ष यंत्रसामुग्री दाखविण्यात यावी.

अति.शहर अभियंता : 797 पैकी 500 कुंडया आलेल्या आहेत.

श्री.रविकांत गवळी : जीपीआर सिस्टीम का लावण्यात आली नाही, ऑफिसमधे बसल्याबसल्या माहिती मिळाली असती आपले वाहन कुठे आहे डम्प केव्हा करत आहे. किती टन घन कचरा जात आहे याचे वजनकाटा होणे आवश्यक होते हया सर्व बाबी सर्वप्रथम आणने आवश्यक होते.

श्री.नारायण कुचे : कराराचा एकही मुद्दा पुर्ण न केल्यामुळे रॅम्केचा करार रद्द करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : रॅम्क्ेच्या करारनाम्यावर दोन स्थायी समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. सन 2008च्या करारावर आजच्या स्थायी समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेत आहे. आपण फक्त रॅम्केच्या विरोधात आहे असे चित्र शहरात निर्माण झालेले आहे. मा.आयुक्तांनी सांगीतल्या प्रमाणे वस्तुस्थिती असेल तर तीन ते चार कोटी रूपये वर्षाला खर्च करीत आहे. मजूर रॅम्केकडे वर्ग करून त्यांचा पगार रॅम्केच्या बीलातुन वजा करत असेल तर हे योग्य होवु शकते. जो करार झालेला आहे तो करार सर्व वर्तमानपत्रात देण्यात यावे सर्व सदस्यांना देण्यात यावा तसेच शहरात ज्या कुंडया रॅम्केने ठेवलेल्या आहे त्यावर औरंगाबाद महानगरपालिकेचे नांव देण्यात यावे. कुंडया कुठल्या वार्डात ठेवलेल्या आहे तसेच जे मजूर/कर्मचारी रॅम्केस दिलेले आहे त्यांना ओळखपत्र देण्यात यावे. रॅम्केचा विषय आज या ठिकाणी संपविण्यात यावा

व रॅम्क्केकंपणीस तीन महिण्यांची काम करण्याची संधी देण्यात यावी व त्यानंतर स्थायी समितीच्या अधिकारात योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : यापुर्वी संधी दिलेली आहे त्यांनी यंत्रसामुग्रीची पुर्तता केलेली नाही. मालमत्ता,पाणीपट्टी वसुली नाही, जकात बंद होणार आहे महापालिकेस उत्पन्न कोठुन येणार आहे याचा विचार प्रशासनाने केलेला नाही. रॅम्केस कार्यादेश देण्याची एवढी घाई का होती.

श्री.रविकांत गवळी : स्थायी समितीने दोन वेळेस अधिकारात ठराव रद्द करून शासनाकडे विखंडीत करण्याकरीता उशीरा पाठविला शासनाचा निर्णय अद्याप पर्यंत आलेला नाही कागदपत्रांची पुर्तता झालेली नाही यंत्रसामुग्री आलेली नाही त्यामुळे या स्थितीत रद्द करण्यात यावा. जी कंपणी कॅपेबल होती त्यांनी निवीदेत भाग घेतला आहे परंतु आज रोजी यंत्रसामुग्री नाही.

श्री.प्रशांत देसरडा : जेवढे काम झाले आहे तेवढेच बील रॅम्केस देण्यात यावे.

श्री.नारायण कुचे : जो पर्यंत करारनाम्याची पुर्तता करत नाही तोपर्यंत पेमेंट थांबविण्यात यावे.्

श्री.सतिष कटकटे : अटी शर्तीची पुर्तता केलेली नाही तसेच जीपीआरएस सिस्टीम राबविण्यात आलेली नाही.

मा.सभापती : मागील एक तासापासून रॅम्कोबाबत सभागृहात चर्चा चालू आहे. सर्व सदस्यांनी याबाबतीत आपआपले मत व्यक्त केले आहे. मा.आयुक्त साहेबांनी रॅम्कोबाबत सविस्तर खुलासा आणि परिस्थीती सभागृहासमोर सांगीतलेले आहे. रॅम्कोने जे करारात आहे त्याप्रमाणे कुठलीही यंत्रसामुग्री आणलेली नाही. कराराही रजिष्टर्ड नाही.् या सर्व बाबींची पुर्तता मा.आयुक्तांनी 07 दिवसांच्या आत करून घ्यावी आणि याबाबतचा सविस्तर अहवाल स्थायी समितीमधे सादर करावा. रॅम्कोने 07 दिवसात कराराची पुर्तता केली नाही ,ॲग्रीमेंट रजिष्टर्ड केले नाही यंत्रसामुग्री आणली नाही तर पुढील स्थायी समिती बैठकीमधे रॅम्कोचा करार पुर्णतः रद्द करण्यात येईल. याबाबत स्थायी समितीचे सोळा सदस्य रस्त्यावर उतरून काम बंद करेल याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

श्री.रविकांत गवळी : 400 फुट जागा सर्व्हे नंबर 12879 बाबत सदर व्यक्तीने महानगरपालिकेला डिपी रोडमधे बाधीत जागा विनामोबदला हस्तांतरीत करून महापालिकेच्या नावाने नोंद केलेली आहे. त्या ठिकाणी अतिक्रमण होवु नये महानगरपालिकेच्या वापरामधे जो पर्यंत जागा येत नाही तोपर्यंत महानगरपालिकेचे नियमास अटी शर्ती राहून भाडे देण्यात यावे.

मा.सभापती : मंजूर करण्यात येतो.

श्रीमती मेहरून्निसा खान : स्पेक कंपणी विरूध्द गुन्हा दाखल केला आहे का? गुन्हा दाखल केला असेल तर त्याची कॉपी देण्यात यावी. 60 लाखांचा गैरव्यवहार केला आहे.

मा.सभापती : स्पेक कंपणी विरूध्द गुन्हा दाखल केलेला आहे काय? तीन दिवसात गुन्हा दाखल करून स्थायी समितीस माहिती देण्यात यावी.

श्री. सोनवणे : मा.आयुक्तांनी माझ्या वार्डात भेट द्यावी म्हणुन विनंती केली होती गेल्या तीन वर्षापासून केंद्र शासनाच्या घरकुल योजनेसाठी निधी आलेला आहे ज्या ठेकेदाराने काम घेतलेले आहे त्यांनी तीन वर्षांत 60 ते 70 घरांचेच काम

| | |
|---|---|
| | झालेले आहे. घरकुल योजनेसाठी,ड्रेनेज,रस्ते यासाठी निधी खर्च करायचा असुनसुध्दा तो खर्च केलेला नाही. महानगरपालिकेचा निधी त्या ठिकाणी खर्च केला जात नाही. ड्रेनेजचे ढापे उघडे ठेवण्यात आलेले आहे म्हणुन मा.आयुक्त साहेबांनी वार्डात भेट देण्यात यावी. |
| मा.सभापती | : मा.आयुक्त साहेबांनी स.सदस्य श्री.कचरू सोनवणे यांच्या वार्डात भेट देवुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.सतिष कटकटे | : सिल्लीखाना ते पैठणगेट रस्त्यांचे रूंदिकरण केले त्याचा एफएसआय मोबदला दयायचा होता त्यांना पैसे द्यायचे होते त्या ठिकाणी दोन टपऱ्या टाकलेल्या आहेत त्या टपऱ्या हटविण्यात याव्यात. |
| मा.सभापती | : सिल्लेखाना पैठणगेट परीसरातील रस्त्यात मोबदला दिलेल्या जागेवरील दोन टपऱ्या प्रशासनाने हटविण्यात याव्यात. |
| मा. सभापती | : विषय क्रमांक 144 मंजूर. |

**<u>विषय क्र. १४४ :</u>**

दिनांक २०/०७/२००९ (का.प.क्र.०७), दि.२७/०७/२००९(का.प.क्र.०८), दि.०७/०८/२००९ (का.प.क्र.०९), दि.१४/०८/२००९ (का.प.क्र.१०), १८/०८/२००९ (का.प.क्र.११), दि. २१, २४, २५, २६ ऑगष्ट २००९ (का.प.क्र.१२), दि. २७ ऑगष्ट २००९ (का.प.क्र.१३), दि.३१/०८/२००९ (का.प.क्र.१४) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २०/०७/२००९, दि.२७/०७/२००९, दि.०७/०८/२००९, दि.१४/०८/२००९, १८/०८/२००९, दि. २१, २४, २५, २६ ऑगष्ट २००९, दि. २७ ऑगष्ट २००९, व दि.३१/०८/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : विषय क्रमांक 145 ते 151 अंदाजपत्रक असल्याकारणाने मंजूर करण्यात यावे. |
| मा.सभापती | : मंजूर. |

**<u>विषय क्र. १४५ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.०६ येथे विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१६,९९,८७०/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक २६/१०/२००९ रोजी मा.स्थायी समिी समोर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

तरी रक्कम रू.१६,९९,८७०/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.०६ येथे विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१६,९९,८७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४६ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड-ब आणि क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडी येथील रत्नदीप हौ.सो., सावजी ले-आऊट व सर्व्हे नं.१५६ मधील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१९,७८,०००/- यास शहर अभियंता यांनी मान्यता दिली असुन सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण दहा निविदा प्राप्त झाल्या आहेत. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.२१% कमी दराची चंद्रम्मा एन. आशन्ना यांची निविदा असुन निविदेस मा.आयुक्त यांची दि.२६/१०/२००९ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक १९,७८,०००/- आहे. त्यानुसार सदरील कामासाठी प्राप्त निविदा प्रमाणे तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.२१% कमी दराची चंद्रम्मा एन. आशन्ना यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडी येथील रत्नदीप हौ.सो., सावजी ले-आऊट व सर्व्हे नं.१५६ मधील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २५.२१% कमी दराची चंद्रम्मा एन. आशन्ना यांची निविदा स्विकारणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.आयुक्त यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी यांत्रिकी कार्यशाळेस भेट देवुन जुनी झालेली व कार्यक्षमता संपलेली वाहने तसेच जमा झालेली जुने निरूपयोगी टायर्स, भंगार साहित्य, रिकामे बॅरल्स इत्यादी लिलावात काढण्याचे निर्देश दिले आहेत. तातडीने जुने भंगार, जुने टायर्स, रिकामे बॅरल्स इत्यादी साहित्याचा लिलाव करण्यास मान्यता दिली आहे. यांत्रिकी विभागात खालील दर्शविलेल्या तारखेपर्यंत जुने निरूपयोगी साहित्य जमा झाले असुन त्याचा लिलाव केल्यास मनपा फंडात रक्कम जमा होईल.

| अ.क्र. | विवरण | दिनांक पर्यंत | एकुण नग |
|---|---|---|---|
| १. | विविध साईजचे जुने निरूपयोगी टायर्स | १५.९.२००९ | ३४४ नग |
| २. | रिकामे ऑईल बॅरल (लोखंडी २१० लिटर)-७१ नग व प्लास्टीक कॅन (१५, २०, २५, ५० लिटर) विविध साईज - ४६ नग | १५.९.२००९ | ११७ नग |
| ३. | जुने भंगार साहित्य | १२.९.२००९ | ११.५ टन |
| ४. | फायर इंजिन डिवॉटरींग सेट | १५.९.२००९ | ०२ नग |

वरील सर्व साहित्याची पाहणी करून त्याची लिलावात किती किंमत येईल हे ठरविण्याकरीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मआ/स्वीस/२५७/०९ दिनांक १८.९.२००९ नुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

१. श्री.उध्दव घुगे, उप आयुक्त (महसुल)
२. श्री. भागवत म्हस्के, शहर अभियंता
३. श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
४. श्री. विलास जाधव, मुख्य लेखापरिक्षक
५. श्री.एम.डी.सोनवणे, अतिरिक्त शहर अभियंता
६. श्री. एम.बी.काझी, उप अभियंता तांत्रिक कक्ष

समितीचा अहवाल बंद लिफाफ्यात गोपनीय राहील व तो मुख्य लेखाधिकारी यांचे ताब्यात ठेवण्यात येईल व लिलावाच्या दिवशीच तुलनात्मक दर पाहण्यासाठी तो उघडण्यात येईल.

तरी वरील प्रमाणे जुने यंत्र सामुग्री साहित्याचे जाहीर लिलाव बोली पध्दतीने करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका औरंगाबाद यांत्रिकी कार्यशाळेतील जुनी झालेली व कार्यक्षमता संपलेली वाहने तसेच जमा झालेली जुने निरूपयोगी टायर्स, भंगार साहित्य, रिकामे बॅरल्स इत्यादी लिलावात काढण्यास तसेच कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मआ/स्वीस/२५७/०९ दिनांक १८.९.२००९ नुसार समिती गठीत करण्यात आलेल्या समितीने सर्व साहित्याची किंमत ठरवुन लिलाव करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १४८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.५९, अजबनगर, पांडुरंग कॉलनी व इतर भागात कॉंक्रेटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याचे सन २००८-२००९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्क्म रू.१२,८६,७००/- होत आहे. सदरील काम सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात नविन कॉंक्रीट रस्ते शहर या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त यांनी दि.३०/१०/२००९ रोजी मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवण्याची शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.१२,८६,७००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५९, अजबनगर, पांडुरंग कॉलनी व इतर भागात कॉंक्रेटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,८६,७००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.८९ ज्योतीनगर येथील दशमेशनगर रेखांकनातील खुल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २००८-२००९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१३,३६,६८०/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असुन या कामाचा खर्च शहर सौंदर्यीकरण (नवीन कामे) या लेखाशिर्षा खाली प्रस्तावित आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.१३,३६,६८०/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८९ ज्योतीनगर येथील दशमेशनगर रेखांकनातील खुल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१३,३६,६८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२ मधील १२ मी. रूंद डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण करणे तसेच खडी रस्ता तयार करण्याच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००८-०९ जिल्हा दरसुची

नुसार रक्कम रू.१४,६३,५३९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मान्यता झलेली आहे. कामाचा खर्च हा नविन डांबरी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत अर्थसंकल्प २००९-२०१० पान क्र.SCR B-१ अ.क्र.१ मधील तरतुदी अंतर्गत करण्यात येणार आहे.

करीता कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१४,६३,५३९/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मधील १२ मी. रूंद डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण करणे तसेच खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,६३,५३९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथील १०० द.ल.लिटर्स जलशुध्दीकरण केंद्राच्या गाळणी हौदांचे व्हॉल्व बदलण्याच्या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १६,५७,०००/- इतकी आहे. अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव सादर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

आर्थिक वर्ष सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात देखभाल व दुरूस्ती पाणी पुरवठा (शहर व जायकवाडी वॉर्ड-ब तरतुद) या लेखाशिर्षकाखाली एकत्रित तरतुद करण्यात आली आहे. करीता अंदाजपत्रक रूपये १६,५७,०००/- चे स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथील १०० द.ल.लिटर्स जलशुध्दीकरण केंद्राच्या गाळणी हौदांचे व्हॉल्व बदलण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१६,५७,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थीनींना शैक्षणिक मदत होणेचे दृष्टीने दुचाकी लेडीज सायकल देणे बाबतच्या प्रस्तावास महिला व बालकल्याण समिती सभा दि.२६/८/२००९ च्या विषय क्र. ०८ अन्वये मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार एकुण ४३४ विद्यार्थीनींसाठी दुचाकी लेडीज सायकल खरेदी प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने राज्यस्तरावर निविदा प्रक्रियेद्वारे (३० जुलै २००९) M/s. Avon Cycle Ltd. यांचेकडून दुचाकी लेडीज सायकलचे दर प्रति उसायकल रू.२९९१/- (रू.दोन हजार नऊशे एक्याण्णव फक्त) दराप्रमाणे खरेदी केली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत महिला व बाल कल्याण समिती तर्फे दुचाकी लेडीज सायकल गरजु विद्यार्थीनींसाठी योजना राबविण्यात येते. या खरेदीसाठी सदरील खरेदी प्रक्रिया शासन निर्णय दि. २ जाने. १९९२ अन्वये करणे बाबतच्या मंजुरीस्तव सादर.

सदरील उपक्रमास येणारा खर्च रू.१२,९८,०००/- (रू.बारा लाख अठ्ठ्याण्णव हजार रूपये) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील खरेदी सन २००९-२०१० च्या महिला व बालकल्याणच्या अर्थसंकल्प निधीमधुन करण्यात येईल. करिता खरेदीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा : महिला बाल कल्याण समितीकडुन हा ठराव आला मी महिला बाल कल्याण समितीचा सदस्य आहे. ज्यावेळी हा ठराव आला त्यावेळी हा मुळ ठराव असा नव्हता. महिला बाल कल्याण समितीच्या अधिकारी यांचेकडुन अशा बऱ्याचशा चुका होता त्याकडे अधिकारी लक्ष देत नाही. त्यामुळे या ठराव जो मुळ महिला बाल कल्याणकडे आला बदलून कसा आला त्यामुळे संबधीत अधिकारी यांचेवर योग्य ती कारवाई केली पाहिजे.

मा.सभापती : विषय क्रमांक 152 रद्द करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. १५३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, न.भु.क्र.12879/1 क्षेत्रफळ 418.00 चौ.मी. पैकी 194 चौ.मी. विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र श्री. भारत नानकराम पारसवानी यांनी मनपास हस्तांतरीत केले असून पी.आर.कार्डवर मनपाचे नांव लागलेले आहे. मनपाने 25% जागा म्हणजे 56 चौ.मी. जागेवर बांधकाम करून मनपास देणे या अटीवर बां. प. दिली आहे. संबंधीताने सदर जागा मनपाच्या अटी-शर्तीनुसार भाडे तत्वावर मागीतलेली आहे. 194 चौ.मी. जागेपैकी उर्वरीत जागेवर संरक्षण भिंत बांधल्यास अतिक्रमण होणार नाही त्यामुळे बांधलेली व शिल्लक जागा संरक्षित राहिल. करीता मनपाच्या अटी-शर्तीनुसार ही जागा कोणत्याही कामात येत नाही, तोपर्यंत संबंधीतास मनपाचे 25% म्हणजे 56 चौ.मी. बांधीव क्षेत्र व उर्वरीत जागा संरक्षण भिंत बांधण्यासह भाडेतत्वावर देण्यात यावे व भोगवटा प्रमाणपत्राचे वेळी अटी-शर्तीची पुर्तता करून घेण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : रविकांत गवळी

**संवाद :**

मा.सभापती : विषय क्रमांक 153 ते 156 मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र.12879/1 क्षेत्रफळ 418.00 चौ.मी. पैकी 194 चौ.मी. विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र श्री.भारत नानकराम पारसवानी यांनी भाडेततत्वावर मागणी केल्यानुसार, सदरील जागा मनपाच्या कोणत्याही उपयोगात येत नाही तोपर्यंत, संबंधीतास मनपाचे 25% जागा म्हणजे 56 चौ.मी. बांधीव क्षेत्र व उर्वरीत जागा संरक्षण भिंत बांधण्यासह भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. भोगवटा प्रमाणपत्राचे वेळी अटी-शर्तीची पुर्तता करून घेण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. 59 अजबनगर-खोकडपुरा अंतर्गत गौतमनगर स्लम येथे समाज मंदीराचे बांधकाम सुरू असून खुल्या जागेत अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. समाज मंदीराचे उद्घाटन 15/11/2009 रोजी करण्याचे प्रयोजन आहे. समाज मंदीराच्या आवारात पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध असून महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणुन खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक तातडीने बसविण्याचे काम करून घेण्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनिमय 1949 अनुसूची-ड प्रकरण 5 नियम 2 (2) अन्वये मंजुरी देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. 59 अजबनगर-खोकडपुरा अंतर्गत गौतमनगर स्लम येथे समाज मंदीराचे खुल्या जागेत अतिक्रमण होण्याची शक्यता लक्षात घेता महानगरपालिकेच्या मालकीच्या

जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणुन खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक तातडीने बसविण्याचे काम करून घेण्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनिमय 1949 अनुसूची-ड प्रकरण 5 नियम 2 (2) अन्वये काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १५५ :</u>**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल व दुरूस्ती करीता विविध पंपगृहासाठी स्लुस व्हॉल्व व नॉन रिटर्न वॉल्वचा पुरवठा करणे, बसविणे इत्यादी कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रक रक्कम रू.१५२४,२०९/- इतके आहे. अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

आर्थिक वर्ष सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात मशिनरी पंप दुरूस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत या कामासाठी तरतूद ठेवण्यात आलेली आहे. करीता अंदाजपत्रक रूपये १५,२४,२०९/- चा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल व दुरूस्ती करीता विविध पंपगृहासाठी स्लुस व्हॉल्व व नॉन रिटर्न वॉल्वचा पुरवठा करणे, बसविणे इत्यादी कामासाठी तचार करण्यात आलेले रक्कम रू.१५,२४,२०९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १५६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ७३ अंतर्गत विविध भागात ड्रेनेज लाईन तुंबण्याचे प्रकार होत आहेत. त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले असून  या भागातील नागरीकांनी तातडीने ड्रेनेज लाईन दुरूस्तीचे काम करण्याची मागणी केलेली आहे. या भागातील ड्रेनेज लाईन व जलवाहिनी बदलण्याचे काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध असुन २,४९,७३०/- चे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. तरी खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.७३ मध्ये विविध भागात ड्रेनेज लाईनदुरूस्ती करणे.- - रू.२,४९,७३०/-

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ७३ अंतर्गत विविध भागात ड्रेनेज लाईन तुंबण्याचे प्रकार होत असून नागरीकांचे आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता तातडीने ड्रेनेज लाईन दुरूस्तीचे काम करून घेणे गरजेचे असल्याने अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुद रू.२,४९,७३०/- चे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

'राष्ट्रगीता'नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद